गुरुवार, 30 जून 2022
किमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - 01 अंक - 296
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● THURSDAY 30 JUNE 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-01 ● ISSUE-296 ● TITLE CODE : MAHMAR51117 ● PAGE-10 ● PRICE-5



# जय महाराष्ट्र

## उद्धव ठाकरे यांनी दिला मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : गेल्या १० दिवसांच्या सत्ता नाट्याचा अंक आता संपुष्टात आला आहे. मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी अखेर आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. शिवसेनेतील नेत्यांची बंडखोरी आणि १० दिवसांच्या सत्तानाट्यानंतर आज अखेर उद्धव ठाकरेंना मुख्यमंत्री पद सोडावे लागले आहे. शिंदे गटाने ३९ आमदारांसह बंड पुकारल्याने ठाकरे सरकार अल्पमतात आले. राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांनी सरकारने बहुमत सिद्ध करावे असे सांगितले. त्याविरोधात शिवसेनेने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. मात्र, न्यायालयाचा निर्णय ठाकरे सरकारच्या बाजूने न लागल्याने उद्धव ठाकरेंवर राजीनामा देण्याची नामुष्की आली.**

आपल्या सर्वांच्या सहकार्याने वाटचाल केली. सरकार म्हणून छत्रपती शिवरायांच्या रायगडला निधी देऊन कामाला सुरुवात केली. शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली, त्यांना कर्जाच्या अडचणीतून बाहेर काढण्यासाठी प्रयत्न केले, असे उद्धव ठाकरे म्हणाले. शेतकऱ्यांसाठी पीक विमा योजनेचा बीड पॅटर्न सुरु केला. बाळासाहेब ठाकरेंचे स्वप्न होते, ते औरंगाबादचे संभाजीनगर असे नामांतर केले. उस्मानाबादचे धाराशीव असे नामांतर केले, असे उद्धव ठाकरे म्हणाले. सर्व चांगले सुरु असताना काही जणांची नजर लागली. आज राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार आणि काँग्रेसचे सोनिया गांधी यांचे आभार मानतो, असे उद्धव ठाकरे म्हणाले. उद्धव ठाकरे यांनी यावेळी मुख्यमंत्रीपदाच्या राजीनाम्यासोबत विधानपरिषदेचा राजीनामा दिला.
औरंगाबादच्या नामांतराचा ठराव मांडला त्यावेळी शिवसेनेचे केवळ आम्ही चार जण होतो, याचा खेद वाटला, असे उद्धव ठाकरे म्हणाले. मी, आदित्य ठाकरे, सुभाष देसाई, अनिल परब उपस्थित होते. राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेसच्या मंत्र्यांनी ठरावाला एका शब्दाने विरोध केला नाही, असे उद्धव ठाकरेंनी म्हटले. रिक्षावाले, हातभट्टीवाले यांना नगरसेवक, महापौर, आमदार, खासदार, मंत्री, ज्यांना मोठे केले, ज्यांना सत्ता दिली, ती लोकं नाराज झाली आहेत. ज्यांना दिले ते नाराज, ज्यांना काही दिले नाही ते हिमतीने समोर, याला म्हणतात माणुसकी, शिवसेना, शिवसैनिक असे उद्धव ठाकरे म्हणाले.

न्यायदेवतेचा निर्णय आला, उद्या राज्यपालांचा फ्लोअर टेस्टचा आदेश आला आहे. राज्यपालांनी लोकशाहीचा मान राखत पत्र मिळताच २४ तासात पत्र दिले आहे. विधानपरिषदेच्या १२ सदस्यांची यादी लटकून पडली आहे. राज्यपालांनी तो निर्णय घेतला असेल तर आम्हाला त्यांच्या बद्दल असलेला आदर द्विगुणित होईलस असे उद्धव ठाकरे म्हणाले.
भाजप-शिवसेना युतीचे पाच वर्षांचे सरकार, त्यानंतर अडीच-अडीच वर्षांचा प्रश्नावरुन या युतीत पडलेली फूट, त्यानंतर शिवसेना -राष्ट्रवादी आणि काँग्रेसने मिळून स्थापन केलेले ऐतिहासिक असे महाविकास आघाडी सरकार आणि आता पुन्हा अडीच वर्षांनंतर शिंदे गटाच्या बंडाळीमुळे मविआची तातातूट. या काही वर्षात महाराष्ट्राने राजकारणाचा ॲक्शन, कॉमेडी, थ्रील, सस्पेन्स, ड्रामा असलेला सुपरहिट सिनेमा पाहिला. यामध्ये वेळोवेळी हिरो आणि विलेनची भूमिका बदलताना आपण पाहिली. सुरुवातीला देवेंद्र फडणवीस हे हिरो होते. मात्र, उद्धव ठाकरे मुख्यमंत्र्यांच्या खुर्चीत बसताच फडणवीस विरोधी भूमिकेत दिसले. महाविकास आघाडीसाठी राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार हे महाविकास आघाडीचे हिरो ठरले. त्यांनी अडीच वर्ष सत्ता टिकवून ठेवली. मात्र, राजकारणातले चाणक्य मानले जाणाऱ्या फडणवीसांनी पुन्हा एकदा सूत्र आपल्या हातात घेतली आणि अखेर महाविकास आघाडीचे सरकार कोसळले.

## महत्त्वाची बातमी

### उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीची घोषणा



आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीची प्रक्रिया सुरु असताना भारतीय निवडणूक आयोगाने आता उपराष्ट्रपती पदाची निवडणूक जाहीर केली आहे. उपराष्ट्रपती व्यंकय्या नायडू यांचा कार्यकाळ १० ऑगस्टला संपणार असल्याने उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीसाठी ६ ऑगस्टला मतदान होईल आणि निकाल जाहीर होईल. तर, दुसरीकडे राष्ट्रपती पदासाठी १८ जुलै रोजी मतदान होणार आहे. निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार उपराष्ट्रपतीपदासाठी ६ ऑगस्टला मतदान होईल आणि निकाल देखील त्याच दिवशी जाहीर करण्यात येईल. उपराष्ट्रपती पदासाठी ५ जुलै रोजी अधिसूचना जारी करण्यात येईल. उपराष्ट्रपती पदासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत १९ जुलै निश्चित करण्यात आली आहे. निवडणूक आयोगाकडून २० जुलै रोजी अर्जांची छाननी होईल. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत २२ जुलै निश्चित करण्यात आली आहे. भारताचे मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार, अनुप चंद्रा पांडे यांच्या बैठकीनंतर निर्णय घेण्यात आला आहे.

## ‘संभाजीनगर’, ‘धाराशीव’ नावांचा प्रस्ताव मंत्रिमंडळात मंजूर

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्यातील राजकीय उलाथापालथीला प्रचंड वेग आला आहे. आज मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या महत्वपूर्ण मंत्रीमंडळ बैठकीत अपेक्षेप्रमाणे नामांतराचे मोठे निर्णय घेण्यात आले. त्यानुसार, औरंगाबाद शहराच्या “संभाजीनगर” नामकरणास आणि उस्मानाबाद शहराच्या “धाराशीव” नामकरणास मान्यता देण्यात आली आहे. हे प्रस्ताव केंद्र शासनास पाठविण्यात येऊन त्यानंतर त्याप्रमाणे विभाग, जिल्हा, तालुका तसेच महानगरपालिका व नगरपालिका यांचे नामांतर करण्यात येईल. याबाबतची कार्यवाही स्वतंत्रपणे महसूल व वन विभाग तसेच नगरविकास विभागाकडून अधिनियमांप्रमाणे करण्यात येईल. याचबरोबर, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे लोकनेते स्वर्गीय दि.बा.पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ या नामकरणास देखील मान्यता देण्यात आली आहे.
नवी मुंबई येथे सिडको महामंडळाच्या माध्यमातून ११६० हे. क्षेत्रावर सार्वजनिक खाजगी भागीदारीतून ग्रीनफील्ड विमानतळ विकसीत करण्यात येत आहे. या विमानतळाच्या नामकरणाच्या अनुषंगाने नवी मुंबईमधील विविध संघटना व राजकीय पक्षांकडून मागणी करण्यात येत होती. याशिवाय आजच्या मंत्रीमंडळ बैठकीत पुढील काही निर्णय देखील घेण्यात आले आहेत. राज्यासाठी हळद संशोधन व प्रक्रिया धोरण लागू करणार. हिंगोली जिल्ह्यात मा. बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन व प्रशिक्षण केंद्र स्थापन करणार. कर्जत (जि. अहमदनगर) येथे दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) न्यायालय स्थापन करणार, अहमदनगर-बीड-परळी वैजनाथ या नवीन रेल्वे मार्ग प्रकल्पाच्या सुधारित खर्चास मान्यता व त्यासाठी राज्य शासनाचा हिस्सा देणार आहे.

## ग्रामपंचायतींमध्ये निवडणुकांचा धुरळा

### 4 ला मतदान, 5 ऑगस्टला मतमोजणी; सुप्रीम कोर्टाच्या निकालानुसार आयोगाकडून घोषणा

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** पावसाचे प्रमाण कमी असलेल्या विविध 62 तालुक्यांतील 271 ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी 4 ऑगस्ट 2022 रोजी मतदान होणार आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार राज्य निवडणूक आयोगाने या संदर्भात घोषणा केली आहे. त्यानुसार संबंधित ठिकाणी आजपासून आचारसंहिता लागू झाली असून 5 ऑगस्ट 2022 रोजी मतमोजणी होईल, अशी माहिती राज्य निवडणूक आयुक्त यू.पी. एस. मदान यांनी आज येथे दिली.
मदान यांनी दिलेल्या माहितीनुसार, सर्वोच्च न्यायालयाच्या 17 मे 2022 रोजीच्या आदेशानुसार पावसामुळे निवडणूक कार्यक्रम बाधित होण्याची शक्यता कमी असलेले 62 तालुके निवडून तेथील ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यानुसार संबंधित तहसीलदार 5 जुलै 2022 रोजी निवडणुकीची नोटीस प्रसिद्ध करतील. नामनिर्देशनपत्रे 12 ते 19 जुलै 2022 या कालावधीत दाखल करण्यात येतील. शासकीय सुट्टीमुळे 16 आणि 17 जुलै 2022 रोजी नामनिर्देशनपत्र दाखल करता येणार नाहीत. नामनिर्देशनपत्रांची छाननी 20 जुलै 2022 रोजी होईल. नामनिर्देशनपत्र मागे घेण्याची अंतिम मुदत 22 जुलै 2022 रोजी दुपारी 3 वाजेपर्यंत असेल. मतदान 4 ऑगस्ट 2022 रोजी सकाळी 7.30 ते सायंकाळी 5.30 या वेळेत होईल. मतमोजणी 5 ऑगस्ट 2022 रोजी होईल.

**विविध जिल्ह्यांत निवडणूक होणाऱ्या ग्रामपंचायतींची तालुकानिहाय संख्या**

नाशिकः बागलाण- 13, निफाड- 1, सिन्नर- 2, येवला- 4, चांदवड- 1, देवळा- 13, नांदगाव- 6. धुळेः धुळे- 2, साक्री- 49, शिंदखेडा- 1. जळगावः रावेर- 12, अमळनेर- 1, एरंडोल- 2, पारोळा- 3, चाळीसगाव- 6. अहमदनगरः अहमदनगर- 3, श्रीगोंदा- 2, कर्जत- 3, शेवगाव- 1, राहुरी- 3, संगमनेर- 3. पुणेः हवेली- 5, शिरुर- 6, बारामती- 2, इंदापूर- 4, पुरंदर- 2. सोलापूरः सोलापूर- 2, बार्शी- 2, अक्कलकोट- 3, मोहोळ- 1, माढा- 2, करमाळा- 8, पंढरपूर- 2, माळशिरस- 1, मंगळवेढा- 4. साताराः कराड- 9, फलटण- 1. सांगलीः तासगाव- 1. औरंगाबादः औरंगाबाद- 1, पैठण- 7, गंगापूर- 2, वैजापूर- 2, खुलताबाद- 1, सिल्लोड- 3, जालनाः जालना- 6, परतूर- 1, बदनापूर- 19, मंठा- 2. बीडः बीड- 3, गेवराई- 5, अंबाजोगाई- 5. लातूरः रेणापूर- 4, देवणी- 1, शिरूर अनंतपाळ- 4. उस्मानाबादः तुळजापूर- 2, कळंब- 1, उमरगा- 5, लोहारा- 2, वाशी- 1. परभणीः सेलू- 3. बुलढाणाः खामगाव- 2 आणि मलकापूर- 3. **एकूण- 271.**

## डॉ.सुरेश साबळेंनी जिल्हा रुग्णालयाचा चेहरामोहरा बदलला

### सोयीसुविधा उपलब्ध करून कर्मचारी-अधिकारी वर्गाला शिस्तही लावली

आधुनिक केसरी न्यूज

सुनिल सिरसाट

अंबाजोगाई : बीड जिल्हा रुग्णालयाची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झालेली होती. दुरुस्त करणे किंवा पूर्वपदावर आणणे इतके सोपे काम नव्हते. परंतु अंगी कमालीची चिकाटी आणि स्वभावाने जिद्दी असणारे डॉ.सुरेश साबळे यांनी जिल्हा शल्य चिकित्सक म्हणून ज्या क्षणाला पदभार स्वीकारला त्या क्षणापासून त्या पदाचा आणि आपल्या जिल्ह्याचा सन्मान कसा वाढेल आणि सर्वसामान्य रुग्णांची होणारी हेळसांड आणि त्यांना मिळणाऱ्या सोयी सुविधा याबाबतीत काय, कसे नियोजन करावे लागेल म्हणजे सर्व काही सुरळीत होईल या विचाराने कामकाजाची सुरुवात केलेले डॉ. साबळे थांबतील ते कसले सी.एस.?

**कधी नव्हे एवढ्या सोयीसुविधा उपलब्ध करून डॉ. साबळेंनी कर्मचारी-अधिकारी वर्गाला लावली शिस्तही**


बीड हे जिल्ह्याचे ठिकाण असल्याने शहराच्या कानाकोपऱ्यात राहणारे गोरगरीब पोरग आणि तालुक्यातून व भाताच्या तालुक्यामधून जिल्हा रुग्णालयात येणारा मोठ्या प्रमाणातील रुग्ण यांना आजपर्यंत जी काही रुग्णसेवा सुविधा मिळाली ती तुटपुंजित होती म्हणले तर वागे ठरणार नाही निर्णया राजकीय पक्षांचे सरकार आले-गेले पालकमंत्री आले-गेले. कधी बजेट अभावी तर कधी लक्ष देणे वाचून रुग्णालयाच्या कारभारात अपेक्षित असे नियोजन किल्ले नही करता आले नाही त्यामुळे रुग्णांची व्हायची तेवढी फरपट व्हायचीच. या जय संधीमुळे आवश्यक आणि अपेक्षित उपचार उच्चार मिळाल्याने बऱ्याच वेळा खासगी रुग्णालयांमध्ये जावे लागायचे आणि मग सध्या तर आपण पाहतच आहोत की खाजगी रुग्णालयात जायचे म्हणजे हाताने कंबरडे मोडून घ्यायचे असे जणू काही समीकरण सध्या खासगी रुग्णालयाच्या होणाऱ्या बिलांवरून दिसून येते. हे सारे चित्र डॉ. साबळे यांनी माजलगाव येथे वैद्य करीत वैद्यकीय अधिकारी म्हणून शाळेत असल्यापासून टिपलेले होते मग या जिल्ह्याचा भूमिपुत्र जेव्हा जिल्हा रुग्णालयाचा प्रमुख अधिकारी म्हणून पदभार घेतो तेव्हा आपल्या लोकांप्रती जिल्हाप्रती आपल्या दायित्वाची जाणीव होणे साहजिक आहे आणि तीच जाणीव भूमिपुत्र डॉ. सुरेश साबळे यांना झाली आणि



या जाणीव यातून सुरेश साबळे यांनी अत्यंत अडगळीतून नाहक सामाजिक राजकीय अडचणीतून तर शासन दरबारच्या अपुऱ्या निधी अजूनही आलेल्या सर्व संकटांना तोंड देत आपल्या सर्व कनिष्ठ वरिष्ठ सहकार्यांना विश्वासात घेत सोबत घेऊन एक एक पाऊल टाकत गेले आणि का कोणास ठाऊक अगदी अंतकरणापासून सुरुवात केलेल्या या दायित्व रुपी कामाला सुरेश सावळे यांनी टाकलेला प्रत्येक पाऊल यशस्वी होत गेला आणि मग मागे फिरून पाहतात ते सुरेश साबळे कसले?
डॉक्टर सुरेश साबळे यांनी उचललेला प्रत्येक पाऊल घेतलेला प्रत्येक निर्णय हा जसा जसा यशस्वी होत गेला तसे तसे त्यांचे कार्य पाहून सहकारी डॉक्टरांची आणि कर्मचाऱ्यांचीही धमक वाढली आणि मग प्रार्थना सुरू झाले खऱ्या अर्थाने सुरुवात झाली ती जिल्हा रुग्णालयाचा चेहरामोहरा बदलण्याची.

**कठीण आणि महागड्या शस्त्रक्रिया सुरू करण्याचे श्रेय सी.एस. डॉ.सुरेश साबळे यांचेच**

आजपर्यंत कधी झाल्या नाहीत अशा कठीण आणि महागड्या मोठ्या शस्त्रक्रिया जिल्हा रुग्णालयात डॉ. सुरेश साबळे यांच्या रात्रंदिवस केलेल्या प्रयत्नांमुळेच होत आहेत. त्यांच्या सहकाऱ्यांनी त्यांना तन-मन-धनाने दिलेल्या साथीमुळे हे दिवस बघायला-अनुभवायला मिळाले आहेत. सारस्वरुपात सांगायचे झाले तर डॉ.साबळे जिल्हा रुग्णालयाचे सी.एस. म्हणून आले आणि बीड जिल्हा रुग्णालयाचा चेहरामोहराच बदलला. तेंव्हा बाहेरून आलेल्या एखाद्या अधिका-याचे काम जर का चांगले असेल तर तशा अधिका-याची बदली झाली वा केली तर त्या विरोधात रान पेटवायची म्हणजेच त्या अधिकाऱ्याची पाठराखण करण्याची बीड जिल्हावाशीयांची पद्धत आहे. मग डॉ.साबळे तर जिल्ह्याचे भुमीपुत्र. तेंव्हा मग आता जिल्हावाशी डॉ.साबळेंना कसे आणि किती जपणार हा आशावादी प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होतो आहे!




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

## मनोरथा चल त्या नगरीला...!

आधुनिक केसरी

त्या काळात आशिया खंडातील सर्वात श्रीमंत आणि वैभवशाली शहरांपैकी हे एक असावे. कृष्णदेवराय या सम्राटाच्या काळात म्हणजे साधारणपणे इ.स, १५०३ ते १५३० हा कालखंड म्हणजे या नगरीचा सुवर्णकाळ मानला जातो. या भारतातील शहराची ख्याती अगदी इराण इराक पर्यंत पोहोचली होती. विविध देशातून हजारो मैलांचा प्रवास करून व्यापारी आणि पर्यटक या नगरात येत असत.

अब्दुल रझाक या पर्शियन प्रवाशाने हंपीबद्दल लिहिताना म्हटले आहे, ' माझ्या नेत्रांनी हंपी इतके अप्रतिम शहर कुठेही पाहिले नाही किंवा ऐकले नाही. अनेक टेकड्यांवर वसलेल्या या शहराला एकामागोमाग एक अशा वर्तुळाकार बांधकाम केलेली सात कोटांची तटबंदी आहे. भर बाजारात दिवसाढवळ्या सोने, चांदी, हिरे, मोती, पाचू इ चे ढीग विक्रीसाठी उघड्यावर ठेवले आहेत. परदेशी व्यापाऱ्यांच्या झुंडीच्या झुंडी खरेदीसाठी येतात. या राज्याचा विस्तार ओरिसापासून ते केरळपर्यँत होता. राजाजवळ सात ते आठ लाख एवढे प्रचंड खडे सैन्य जय्यत तयार होते. चलनामध्ये सोन्याची नाणी वापरली जात होती. अत्यंत वैभवशाली अशा या राज्याची १५६० नंतर दुर्दशा होत गेली. १५६५ ला या नगरीवर बहामनी राजांनी आक्रमण केले. त्यात तालिकोट (राक्षसतागडी) येथे झालेल्या घनघोर युद्धात विजयनगरचा पराभव झाला.

या आक्रमकांनी ही नगरी तर जिंकलीच पण या या सुंदर नगरीची कमालीची दुर्दशा केली. तीन महिने हे शहर लुटले जात होते. आक्रमकांनी या शहरातील सुंदर प्रासाद, देवळे, उत्तम वास्तुशिल्पाचा नमुना असलेली घरे तोडफोड आणि जाळपोळ करून उध्वस्त केली. राजप्रासादांना आगी लावल्या. आज आपण जे हंपी पाहतो ते म्हणजे या सगळ्यांचे उरलेले भग्नावशेष. या आक्रमकांच्या हल्ल्यातून वाचले ते अत्यंत देखणे असे विरुपाक्ष मंदिर. हा एक आश्चर्यकारक योगायोग. हे विरुपाक्ष मंदिर म्हणजे त्या काळातील भाविकांचे आणि पर्यटकांचे प्रमुख आकर्षण होते. वैभवशाली विजयनगर साम्राज्याचा उदय आणि अस्त यांचे हे मंदिर मूक साक्षीदार आहे. आज इतक्या वर्षांनंतरही आपल्याला हे मंदिर पाहताना ते गतकाळातील वैभवाची साक्ष देते. त्या काळातील स्थापत्य, शिल्पकला, मूर्तिकला किती प्रगत आणि विकसित होती याची जाणीव पाहताना होते. या मंदिराचे पूर्वेकडील गोपुर १०५ फूट उंच म्हणजे जवळपास दहा मजली इमारतीएवढे उंच आहे. त्यावर विविध प्रकारच्या मुर्त्या, नक्षीकाम आणि देखावे कोरलेले आहेत. मंदिराच्या मध्यभागी एक विशाल असे प्रांगण आहे. त्यातही अनेक देखणी गोपुरे आहेत.

**(क्रमशः)**



## आनंदी पहाट

### मुलांच्या बालपणी भावनिकतेतून त्यांचा विकास करावा

आधुनिक केसरी

कडक शिस्तीने वाढवलेल्या मुलांमध्ये बंडखोरी, राग, आक्रमकता आणि अपराधीपणा यासारख्या असामाजिक वर्तणुकीच्या समस्या असतात. जरी काही पालकांना असे वाटते की कठोर पालकत्व चांगले वागणारी मुले तयार करणे. परंतू प्रत्यक्षात अधिक वर्तणुकीची समस्या असलेल्या मुलांची निर्मिती / प्रगती चांगली होते. नियम स्थापित करणे आवश्यक आहे, जेव्हा आवश्यक असेल तेव्हा शिस्त लावणे आवश्यक आहे, परंतु सर्वात महत्त्वाचे म्हणजे, मुलाला खात्री असणे आवश्यक आहे की त्याची उपस्थिती आनंद देण्यासाठी पुरेसे आहे. ज्या मुलांचे त्यांच्या आईशी जवळचे नाते असते, त्यांची शाळेत चांगली कामगिरी होते. कारण आई देखील त्यांच्या मुलांची भावनिक बुद्धिमत्ता जोपासत असते. ती त्यांना मोकळे, त्यांच्या सभोवतालच्या आणि इतरांच्या भावनांबद्दल संवेदनशील राहण्यास शिकवत असते. यामध्ये देखील सशक्त कुटुंबे एकमेकांच्या आनंदाला चालना देण्यासाठी स्वतःला वचनबद्ध करतात. कौटुंबिक सदस्यांमध्ये काळजी आणि ऐक्याची भावना विकसित करण्यासाठी वचनबद्धता हा एक महत्त्वाचा घटक आहे. सौम्य पालकत्व हा एक पालकत्वाचा दृष्टीकोन आहे, जो बाह्य दबावांऐवजी अंतर्गत इच्छेच्या आधारावर निवड करण्यासाठी तुम्ही आणि तुमच्या मुलामधील भागीदारीला प्रोत्साहित करतो. सकारात्मक पालकत्व हे परस्पर आदर, मुलाच्या सामाजिक आणि भावनिक विकासात सुलभता आणणे, स्तुती करणे, दृढ परंतु मैत्रीपूर्ण संवादासह स्पष्ट नियम स्थापित करणे आणि न्याय्य वागणूक याद्वारे साध्य करणे आहे. अशा कुटुंबातील मुलांचा व्यक्तिमत्व विकास अत्यंत झपाट्याने आणि चांगल्याप्रकारे होत राहतो. सकारात्मक पालकत्व, संलग्न पालकत्व, बिनशर्त पालकत्व, आध्यात्मिक पालकत्व आणि हळू पालकत्व अशा स्वरूपातील पालकत्वामुळे मुलांचा मानसिक, बौद्धिक, शारीरिक, सामाजिक, वैचारिक, भावनिक पातळीवरील व्यक्तिमत्व विकास चागल्या प्रकारे होत राहतो.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

### देह हो पंढरी | श्वास माझा ||

निर्हेतू व्यवहार | घडो माझे हाती ||
दोष नको माथी | देवा कैसा ||१||

फळाच्या आशेने | घडू नये कर्म ||
साधावा स्वधर्म | उच्च ऐसा ||२||

नामाच्या भजनी | रमू दे सदैव ||
माझा वासुदेव | पांडुरंग ||३||

भक्तीचा ओलावा | रूजावा अंतरी ||
देह हो पंढरी | श्वास माझा ||४||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## "नीतिशतक निरुपण"

आधुनिक केसरी


**छिन्नोऽपि रोहति तरूः क्षीणोऽप्युपचीयते पुनश्चन्द्रः।**
**इति विमृशन्तः सन्तः सन्तप्यन्ते न दुःखेषु ।।**

**अर्थ :** तोडला गेलेला वृक्ष पुनः वर येतो. कृष्णपक्षातील क्षीण चंद्र पुनः वृद्धीस प्राप्त होतो. असा विचार करणारे संतजन दुःखाच्या स्थितीतही संतप्त किंवा शोकग्रस्त होत नाहीत. दुःखानंतर सुख येत असते, असा सकारात्मक विचार संतजनांकडे असतो. म्हणून विपन्नावस्थेतही ते संतजन शोकावस्थेस प्राप्त होत नाहीत; असे प्रतिपादन या श्लोकात कविराज भर्तृहरींनी केले आहे.



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## ।। दासबोध स्तवन ।।



### ब्रह्मपावन निरूपण

आधुनिक केसरी

वेद, ब्रम्हदेव, शेषशायी हे ज्या ब्रम्हाचे वर्णन करताना थकले. ते पराभूत झाले. त्या परब्रम्हाला आपण ओळखावे. त्यासाठी विशेष प्रयत्न करावा. आणि परमात्म्याला शरण जावे. अध्यात्मश्रवणाने परब्रम्हाला आपलेसे करावे त्याचे अतिंद्रिय स्वरूप ओळखावे. परमात्म स्वरूप म्हणजे.कोणत्याही एका रंगाचे नाही. ते व्यक्त नाही. ते अव्यक्त नाही. ते इंद्रियांनी दिसत नाही. असे ते परमात्म स्वरूप अतिंद्रिय आहे.देव निर्गुण निराकार आहे असा प्रत्यक्ष अनुभव घ्यावा. म्हणजे मग आपणच आपल्या अंतर्यामी स्वतः चा शोध घ्यावा."माझे"शरीर असे आपण म्हणतो. याचा खरा अर्थ देहाहून वेगळीचं आहे.

"माझे मन " अशी जाणीव आपल्याला असते. म्हणजे मनही खरे नसते असा अर्थ निघु शकतो. आपल्या देहाचा विचार केला तर तो पंचमहाभूतांचे विस्तारीकरण आहे. आपले शरीर हे या पंचमहाभूतांचे गाठोडे आहे. कोणी त्याचे विवरण केले तर आज मीपणाने वावरणारे आपणच ऊरत नाही. निरंतर टिकणारा आत्मा तेवढा शिल्लक रहातो.जेथे मीपणालाच जागा उरत नाही तिथे जन्ममरणाच्या गोष्टींना काहीच अर्थ रहात नाही.खरे पहाता परमात्म वस्तुला पापपुण्याचा स्पर्श होत नाही. निर्गुण भक्तित जन्ममरणाला स्थान रहात नाही."मी देहच आहे"ही द्रुढ भावना आपल्या बंधनास कारण होते.विवेकाने ती भावना उकलावी. "मी निर्गुण निराकार आ्त्मा आहे हे विवेकान ओळखल्यावरचं त्याचे अखंड अनुसंधान ठेवण्यासाठी अभ्यास करावा. त्यातून स्वस्वरूपानुभव ऊदय पावतो.एकदा का स्वस्वरूपाची ओळख झाली की आत्मज्ञानाने आत्मस्वरूप झाल्यावर देह प्रारब्धावर सोडून स्वानंदात रहावे. अशा रितीने देव व भक्त एकरूप होतात.



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

**देह मोक्षपदास कसा पोहचतो!**

'मी देहच आहे'या द्रुढभावनेने जीव बांधलेला असतो. विवेकाने त्या बंधनातून तो मोकळा होतो. देहबुद्धी सुटन तो देहाच्या पलीकडे गेला म्हणजे तो मोक्ष पदास पोहचतो. अशा रितीने देह व देव याचा परमात्म्याला शरण जाण्याच्या पर्यन्त चा प्रवास आहे.


निर्गुण आत्मा हाच खरा मी आहे असा साक्षात अनुभव येणे म्हणजेच जन्माचे सार्थक होय. **(क्रमशः)**

## गोरखनाथ : जीवनचरित्र

आधुनिक केसरी

भगवान महादेवांनी त्याला उठवून प्रेमाने मिठी मारली आणि ते भगवान दत्तात्रेयांना म्हणाले,"या देहधारी बालकाला मी समुद्रकिनाऱ्यावर माशाच्या गर्भात पाहिले होते आणि गर्भावस्थेतच या बालकाने मी दिलेले पूर्ण ज्ञान आणि उपदेश ऐकला आणि तो पूर्णपणे समजावून घेतला. हा शिशुअवतार आहे. आपण याला नाथ पंथाची दिक्षा देऊन योग्य तेच केल. आता आपण याला गुप्त विद्येचे ज्ञान द्यावे. हा शिष्य संपूर्ण जगात आपले नाव करेल. तो एक दैदीप्यमान पुरुष ठरेल. इतके सांगून भगवान शंकर अंतर्धान पावले. भगवान दत्तात्रेयांनी मच्छिन्द्रला वेद, वेदांग, मंत्र, तंत्र आदि सर्व शास्त्रात पारंगत केले आणि त्याला गावोगावी जाऊन प्राणीमात्रांचे दुःख दूर करण्याचा आदेश दिला.

गुरु श्री दत्तात्रेय यांच्या आदेशानुसार श्री मच्छिन्द्र देशाटन करीत करीत तीर्थस्थेळे फिरू लागले आणि अशा तऱ्हेने बारा वर्षे घालविल्यानंतर त्यांनी शाबरतंत्राची रचना केली.त्यांना परमेश्वराने प्रसन्न होऊन वर दिला होता. हे मच्छिन्द्रा, तू रचलेल्या शाबर तंत्राचा जो शुध्द अंतःकरणाने उपयोग करेल, त्याची मनोकामना सदैव पूर्ण होईल. आजपासून तू जगात



मच्छिन्द्रनाथ या नावाने ओळखला जाशील. काही काळानंतर मच्छिन्द्रनाथ बंगालमधील चन्द्रागिरी या गावी पोहोचले.तिथे सूर्यदयाल नावाचा पंडित रहात होता. त्याच्या बायकोचे नांव सरस्वती होते. ती पतीनिष्ठ होती पण निपुत्रिक होती.

एके दिवशी मच्छिन्द्रनाथ काखेत मृगजीन, डाव्या हातात चिमटा, उजव्या हातात कमंडलू अशा वेषात अलख निरंजनचा घोष करीत सरस्वतीच्या घरी आले. जेव्हा सरस्वतीने घरातूनच अलख निरंजनाचा घोष ऐकला तशी ती एका भांड्यात अन्न घेऊन अगबगीने दारात आली. तिने मच्छिन्द्रनाथांना दारात उभे असलेले पाहिले. मच्छिन्द्रनाथांच्या कमंडलूत भिक्षा टाकून ती त्यांच्या पाया पडू लागली. मच्छिन्द्रनाथांना तिच्या भावना कळायला फारसा वेळ लागला नाही.मूलबाळ नसल्याने ती अतिशय दुःखी असल्याचे त्यांच्या लक्षात आले. तरीपण त्यांनी तिला विचारले,"हे माते तूझ्या दुःखाचं कारण काय? तू इतकी कष्टी का आहेस? हे कृपा करून सांगशील का?" सरस्वती म्हणाली, "हे प्रभू तसा मला कुठलाही त्रास नाही. पण मी निपुत्रिक असल्याने सगळेजण मला वांझोटी म्हणून हिणवत असतात. त्यामुळेच मी फार दुःखी आहे. मच्छिन्द्रनाथ सरस्वतीचे बोलणे ऐकून प्रसन्न झाले आणि त्यांनी तिला हात पुढे करावयास सांगितले, आणि झोळीतून विभूती काढून तिच्या हातावर ठेवीत म्हणाले,"मासिक पाळीनंतर तू खीर बनवून, त्यात हे भस्म टाक व त्याचे भक्षण कर. तुझ्या घरी एक असामान्य बालक जन्माला येईल जो ऋध्दिसिध्दित पारंगत असेल. मी बारा वर्षानंतर परत इथे येईल."

# हैदराबाद मुक्तिसंग्रामातील योद्धे स्वातंत्र्यसेनानी काशीनाथ नावंदर काळाच्या पडद्याआड

आधुनिक केसरी न्यूज



**औरंगाबाद :** हैद्राबाद मुक्तिसंग्रामातील निजाम सरकार आणि रझाकारांच्या विरोधात सशत्र लढ्यात सहभागी असलेले स्वातंत्र्यसैनिक जेष्ठ विधिज्ञ काशीनाथ नावंदर यांचे आज निधन झाले. वयाच्या ९५ वर्षी वृद्धापकाळाने शहरातील पदमपुरा येथील निवासस्थानी त्यांचे निधन झाले आहे.

स्वातंत्र्यसैनिक काशीनाथ नावंदर स्टेट काँग्रेसचे कार्यकर्ते होते. त्यांनी भूमिगत राहून औरंगाबाद तहसील कचेरीवर बॉम्बस्फोट घडवण्याचा कट रचला होता. परसोडा आणि रोटेगावचे रेल्वे रूळ त्यांच्या गटाने उखडले होते. तारा तोडून निजाम सरकारची दळणवळण व्यवस्था त्यांनी आपल्या परीने उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न केला. सिद्धार्थ उद्यानाजवळचा पूल स्फोटाने उडवून छावणीचा शहराशी संपर्क तोडण्याचेही प्रयत्न त्यांनी केले होते.

**काशिनाथ नावंदर यांचा अल्पपरिचय**

२७-१०-१९२७ रोजी झाला. प्राथमिक शिक्षण गंगापूर व नंतरचे औरंगाबाद येथे झाले. उस्मानिया विद्यापीठातून ते बी.एस्सी. एल.एल.बी. पास झाले. १९५४ पासून औरंगाबाद येथे त्यांनी वकिली व्यवसाय सुरु केला. १९८१ पासून हायकोर्ट प्रॅक्टिस सुरू केली. १९४६ पासून त्यांनी सक्रिय राजकारणात भाग घ्यायला सुरुवात केली.

**हैदराबाद मुक्तिलढ्यात सशस्त्र सहभाग**

महाराष्ट्र परिषद, समर्थ व्यायामशाळा, गणेश संघ अशा संस्थांमधून त्यांनी राजकीय जागृतीचे कार्य केले. राष्ट्र सेवा दलाचे ते सक्रिय कार्यकर्ते होते. ४७-४८ च्या हैदराबाद मुक्तिलढ्यात त्यांचा सक्रिय सहभाग होता. हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या भूमिगत लढ्यासाठी औरंगाबाद शहरात केंद्रप्रमुख म्हणून त्यांनी कार्य केले होते. विद्यार्थी आणि तरुणांसाठी लढ्याचे शिक्षण देणारे कॅम्प त्यांनी उभे केले. शाळा, कॉलेज, कोर्ट यांच्यावर बहिष्कार टाकण्याच्या चळवळी त्यांनी उभ्या केल्या. सरकारी इमारती, रस्ते, पूल उडविणे, पत्रके काढून निज़ामविरोधी वातावरण तयार करण्यात सक्रिय होते. सरकारी यंत्रणा उलथवून टाकण्यासाठी मनमाड या मुख्य सीमोषेवर भूमिगत चळवळी केल्या.

**स्वातंत्र्यानंतर राजकारणात सक्रीय**

स्वातंत्र्य मिळाल्यावरही ते राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात कार्यरत राहिले. हैदराबाद संस्थान भारतात विलीनीकरणाच्या पोलिस ॲक्शननंतर त्यांनी समाजवादी पक्षात प्रवेश केला. नंतर प्रजासमाजवादी पक्ष, संयुक्त समाजवादी पक्ष, जनता पार्टी, जनता दल असा राजकीय प्रवास अनेक पदांवर राहून केला. १९८० साली झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीत इंदिरा काँग्रेसच्या विरोधात त्यांनी जनता दलाच्या तिकिटावर निवडणूक लढवली. आय काँग्रेसने अब्दुल अजीम यांना तिकीट दिले होते. या निवडणुकीत जनता दल आणि जनसंघातील युतीची बोलणी फिस्कटली. नावंदर यांचा पराभव करून अब्दुल अजीम आमदार झाले. त्यांनी मराठवाड्याच्या अनेक प्रश्नांवर उग्र लढे दिले. संयुक्त महाराष्ट्र समितीत अमूल्य योगदान दिले. औरंगाबाद शहरात बाहेरून आलेल्या निराधार लोकांसाठी झोपडी संघाची स्थापना केली. दक्षता समिती, लायन्स क्लब, तत्कालीन मराठवाडा विद्यापीठ सिनेट या माध्यमातून कार्य केले. लायन्स क्लबद्वारा अनाथ बालकांसाठी बालग्रामाची स्थापना केली. मराठवाडा विकास ब्रॉडगेज रेल्वे यासाठी वेळोवेळी सत्याग्रह केले.

**जेष्ठ विधिज्ञ म्हणून महत्वपूर्ण काम**

जनसंघाने मदत न केल्यामुळे पराभव स्वीकारावा लागल्याचा सल अखेरपर्यंत त्यांच्या मनात राहिली. त्यानंतर त्यांनी राजकारणाऐवजी वकिलीतच जम बसवला. बार असोसिएशनचे अध्यक्ष असताना मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबादला सुरू व्हावे, यासाठी पंतप्रधान इंदिरा गांधी यांचीही त्यांनी भेट घेतली होती. गेल्या काही वर्षांपासून वृद्धापकाळामुळे ते सामाजिक जीवनात सक्रीय नव्हते. त्यांच्यावर बुधवारी सायंकाळी आयोध्यानगरी येथील स्मशानभुमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## लिंक नसल्यामुळे पोस्ट ऑफिसची कामे झाली ठप्प

आधुनिक केसरी न्यूज

**लोणार :** सतत काही दिवसांपासून लोणार येथील पोस्ट ऑफिसमध्ये लिंक फेलचा खेळ सुरू आहे. यामुळे व्यवहार ठप्प झाले आहे. पोस्ट ऑफिस कार्यालय मध्ये आपल्या विविध कामासाठी येणाऱ्या नागरिकांना बसावे लागत आहे काही दिवसापासुन असाच प्रकार सुरू असल्याने नागरिकांना याचा त्रास सहन करावा लागत आहे.

सध्या शेतकऱ्याची पेरणीची कामे सुरू असून बियाणे, खत खरीदीसाठी शेतकऱ्यांना आपल्या खात्यातून पैसे काढणे पाठवणे व्यवहारासाठी पोस्ट ऑफिसकडे जावे लागत आहे व अशा वेळेस फार अडचणीचा सामना करावा लागत आहे. या विभागांमध्ये शासनाच्या विविध योजनाचे आर्थिक व्यवहार सुरू झाल्याने या विभागांमध्ये नागरिकांनी मोठ्या प्रमाणात खाते उघड केले आहे परंतु या ठिकाणी नेहमीच लिक बंद होत असल्याने या ठिकाणी नागरिकांना कामा खाली हात परत जावे लागत आहे.

या विभागांमध्ये गरोदर मातांचे खाते वयोवृद्धांचे विविध योजनांचे खाते पेन्शन धारक यांचे खाते अशा शासनाच्या विविध योजना च अनुदान या खात्यामध्ये जमा होत असल्याने या खातेधारकांना वेळेवर काम होत नसल्याने मानसिक ताण वाढत आहे. भारतीय स्टेट बँकेमध्ये आर्थिक व्यवहारात मोठ्या प्रमाणात होत असल्याने त्या ठिकाणी नागरिकांना आपल्या कामासाठी खूप मोठा त्रास होत होता. या नागरिकांनी पोस्ट ऑफिसमध्ये खाते उघडून त्रास कमी झाला पाहिजे, या उद्देशाने पोस्ट ऑफिस मध्ये व्यवहार सुरू केले परंतु या ठिकाणी लिंक फेल असल्याच्या कारणामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत.

## पती-पत्नीस मारहाण करणाऱ्याविरुद्ध गुन्हा दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**लोणार :** घरात घुसून मारहाण व शिवीगाळ करणाऱ्यांवर चौघांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

लोणार तालुक्यातील गोत्रा येथील सौ.कावेरी कुंडलिक घाटे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून त्याचा शेजारी राहणाऱ्या आरोपी चंद्रभान शंकर साबळे, सुभाष चंद्रभान साबळे, दत्तात्रय चंद्रभान साबळे, चंद्रकला चंद्रभान साबळे यांनी घराच्या बाजुने वापरता रस्ता नसतानाही दरवाजा पाडला व माझ्या गुरांचा गोठ्याचे पत्रे लाकडे काढून फेकून दिली. त्यांना विचारले असता अश्लील शिवीगाळ करत घरात घुसून मारहाण केली. आरोपी सुभाष चंद्रभान साबळे याने त्याचा हातात असलेल्या चाकूने माझ्या हातावर वार केला व माझ्या पतीचा गळा आवळून जिवे मारण्याची धमकी दिली.

या फिर्यादीवरून आरोपींविरुद्ध कलम ४५२, ३२४, २९४, ५०४, ५०६, ३४ भादवी नुकसान गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक यांच्या मार्गदर्शनात बिट जमदार बन्शी पवार करीत आहे.

## सांगली बँकेच्या संचालकपदी श्रीकांत देशपांडे यांची निवड

आधुनिक केसरी न्यूज



**वसमत :** सांगली अर्बन को ऑप बँक लि. सांगली या अग्रगण्य बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणूका रविवारी पार पडल्या. मराठवाडा आणि पुणे जिल्हा विभागातून श्रीकांत कमलाकरराव देशपांडे (नाना) वसमत हे भरघोस मतांनी विजयी झाले आहेत.

वसमतनगर सारख्या छोट्या तालुक्याचे ठिकाणी वास्तव्यास असणारे श्रीकांत देशपांडे फार वर्षापासून सहकार क्षेत्रात तसेच भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात सतत अत्यंत कार्यक्षम पणे सक्रिय आहेत.

कुठे सांगली आणि कुठे वसमतनगर, पण हळद, केळी आणि गुळ ही प्रमुख पिके वसमत आणि सांगलीची नाळ जूळवतात आणि शेतकऱ्यांच्या सोयीसाठी सांगली ही मोठी बाजारपेठ असल्याकारणाने सांगली अर्बन को ऑप बँकेने मराठवाड्यात भरपूर शाखा विस्तार केला आहे. कारण वरील नगदी पिकांव्यतिरिक्त केळी, ऊस ही ही नगदी पिके मराठवाड्यात मोठ्या प्रमाणात घेतली जातात.

व्यावसायिक नानासाहेब परभणी, हिंगोली, बीड, औरंगाबाद, जालना, लातूर या जिल्ह्यांसह सांगली भागातही दांडगा जनसंपर्क साधून आहेत. प्रभावी व्यक्तिमत्व, नेमके तेवढेच आणि आग्रही बोलणे. मिळून मिसळून राहण्याचा स्वभाव असूनही भारदस्तपणा नसानसात भिनलेला आहे. गाडगीळ साहेब, आणि इतर संचालक यांना प्रिय असणारा नाना बँकेचा व्यवसाय वाढवण्यात नेहमीच पूढे असतो.

सर्वसामान्य गरजू उद्योजकांना, व्यापाऱ्यांना बँकेचा मार्फत अत्यावश्यक अर्थसहाय्य आणि तत्पर सेवा उपलब्ध व्हावी यासाठी सतत धडपड चालू असते.

मराठवाड्यात सर्वदूर बँकेच्या सेवेचे जाळे विणताना अचूक गावात शाखा विस्तार केला. सर्व ब्रँचेसना सतत व्हिजीट देऊन स्टाफच्या अडचणी तसेच खातेदारांच्या समस्या, तक्रारी यांचे निराकरण करणे हे सर्व नेमके पणाने करून सभासद विस्तार आणि बँकेचा व्यवसाय वाढवत आहेत. या अभूतपूर्व यशाबद्दल प्रकाश पांडुरंगराव महागांवकर यांनी नानाचे आणि सर्व विजयी संचालकांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे.



## विद्यार्थ्यांनी अभ्यासासोबतच क्रीडा क्षेत्रातही प्राविण्य मिळवावे : गिते

### पहूर येथील महात्मा फुले शिक्षण संस्थेचा वर्धापनदिन सोहळा

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** जामनेर तालुक्यातील पहूर येथे-शालेय अभ्यासासोबतच विद्यार्थ्यांनी विविध क्रीडा स्पर्धांमध्ये प्राविण्य मिळवावे, असे आवाहन जळगाव जिल्हा माध्यमिक आणि उच्च माध्यमिक मुख्याध्यापक संघाचे उपाध्यक्ष तथा महात्मा फुले शिक्षण संस्थेचे शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष एस. व्ही. गीते यांनी केले. ते पहूर येथील महात्मा फुले शिक्षण संस्था संचालित डॉ. हेडगेवार प्राथमिक विद्यालय व सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालयाच्या १७ व्या वर्धापन दिना निमित्त आयोजित विद्यार्थी गुणगौरव सोहळ्याच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते.

आज २८ जून रोजी सकाळी ९ वाजता शाळेच्या प्रांगणात आयोजित या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महात्मा फुले शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष बाबुराव घोंगडे यांनी भूषविले. प्रारंभी विद्यार्थिनींनी ईशस्तवन सादर केले. यावेळी जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष दिलीप खोडपे, शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष तथा केंद्रप्रमुख रामचंद्र वानखेडे, ॲड एस.आर. पाटील आदींनी शाळेच्या कार्याचा गौरव करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. शाळेतर्फे मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. यावेळी इयत्ता दहावीत प्रथम आलेल्या अमृता सोनवणे, द्वितीय आलेल्या सुहाना तडवी, तृतीय आलेल्या पल्लवी घाटे यांच्यासह विविध कला, क्रीडा, साहीत्य क्षेत्रात प्राविण्य मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ व रोख बक्षीस देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर गेल्या दोन वर्षांपासून राहिलेल्या दहावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांनाही यावेळी रोख बक्षीस देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच इयत्ता पहिली ते नववीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा ही गौरव करण्यात आला.

याप्रसंगी माजी जिल्हा परिषद सदस्य राजधर पांढरे, संस्थेचे उपाध्यक्ष शांताराम पाटील, सचिव भगवान घोंगडे, संचालक शंकर घोंगडे, लक्ष्मण गोरे, ज्ञानेश्वर लहासे, समाधान पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती संजय देशमुख, माजी सरपंच शंकर जाधव, पत्रकार गणेश पांढरे, शिवाजी राऊत, संदीप बेढे, डॉ. जितेंद्र घोंगडे, डॉ. सचिन भडांगे, सेवानिवृत्त नायब तहसीलदार आनंदा काळे, शिक्षक पालक संघाचे माजी उपाध्यक्ष श्रावण घोंगडे, विजय मोरे आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका व्ही.व्ही. घोंगडे यांनी केले. प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक अजय देशमुख यांनी अहवाल वाचन केले. सूत्रसंचालन पल्लवी वानखेडे यांनी तर आभार अमोल क्षीरसागर यांनी मानले. यशस्वीतेसाठी उपमुख्याध्यापिका कल्पना बनकर, १० वीचे वर्गशिक्षक हरिभाऊ राऊत यांच्या सर्व शिक्षक -शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले. यावेळी पालक, विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# नामकरण राजकारण

आधुनिक केसरी

नवी मुंबई विमानतळाला शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे नाव देण्याचा आग्रह धरत ठाणे, रायगड जिल्ह्यातील आगरी-कोळी समाजाचे आंदोलन ओढावून घेणारे बंडखोर नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्या विरोधात या दोन्ही जिल्ह्यांमधील आगरी-कोळी नेत्यांची मोट बांधण्याचे जोरदार प्रयत्न आता शिवसेनेकडून सुरू झाले आहेत. या प्रयत्नाचा एक भाग म्हणून विमानतळास दि. बा. पाटील यांचे नाव देण्याच्या मागणीस मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी पाठिंबाजनक अनुकूलता दर्शवली आहे. नामकरणाच्या मुद्द्यावरून मागील दीड वर्षापासून भूमिपुत्र म्हणविला जाणारा हा समाज सातत्याने रस्त्यावर उतरत आहे. गावागावांमधून आगरी-कोळी समाजातील तरुणांच्या बैठका होत आहेत. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी इतके दिवस या मुद्द्यावर कोणतीही भूमिका जाहीर केली नव्हती. शिंदे यांच्या बंडानंतर मात्र नामांतरणाची खेळी शिंदे यांच्यावर उलटविण्याचा ठाकरे यांचा प्रयत्न दिसतो आहे. ठाणे आणि रायगड जिल्ह्यातील आगरी-कोळी समाज ही अनेक वर्ष शिवसेनेची जमेची बाजू राहिली आहे. शिवसेनेचे दिवंगत जिल्हाप्रमुख आनंद दिघे यांनी ठाणे आणि पालघर जिल्हा पालथा घालत शिवसेना रुजवली. गावागावांमधून शाखांची उभारणी केली. हे करत असताना दिघे यांना भूमिपुत्रांची निर्णायक अशी साथ मिळत गेली. आगरी-कोळी, कुणबी, आदिवासी हा ठाणे-पालघर जिल्ह्यातील मूळ भूमिपुत्र समाज. या समाजातील तरुणांना शिवसेनेने अगदी पहिल्यापासून आपलेसे केले. पक्षाचे एके काळचे बंडखोर नेते गणेश नाईक यांच्यामुळे या समाजामध्ये शिवसेनेची पाळेमुळे अधिक घट्ट होत गेली. मात्र नाईक यांच्या बंडानंतरही आगरी समाजातील बहुतांश नेते शिवसेनेसोबत राहिले हे विशेष. इतक्या मोठ्या संख्येने हाताशी असलेला हक्काचा मतदार विमानतळ नामकरणाचा वाद ओढवून घेत शिवसेनेने दुखावला हे नाकारता येणार नाही. नवी मुंबईतील सिडको प्रकल्पग्रस्तांसाठी निर्णायक आंदोलन उभारणारे दिनकर बाळू उर्फ दि. बा. पाटील यांचे नाव नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला दिले जावे अशी येथील प्रकल्पग्रस्त, भूमिपुत्रांची मागणी आहे. 'सिडकोने नवी मुंबई प्रकल्पासाठी आम्हा भूमिपुत्रांकडून स्वस्तात जमिनी संपादित केल्या आणि पुनर्वसनाच्या मुद्द्यावर हात आखडता घेतला', या भावनेतून ऐंशीच्या दशकात प्रकल्पग्रस्तांचे अभूतपूर्व असे आंदोलन झाले. या आंदोलनाची धुरा दि.बा यांनी वाहिली होती. जासई येथील आंदोलनादरम्यान झालेल्या पोलीस गोळीबारात काही प्रकल्पग्रस्तांना जीव गमवावा लागला. त्यानंतर आंदोलनाची धार तीव्र झाली. पुढे राज्यात शरद पवार मुख्यमंत्री असताना त्यांनी प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी साडेबारा टक्के जमीन योजना अमलात आणली. या योजनेविषयीही नाराजी होती. मात्र दि. बा. पाटील यांच्या आंदोलनामुळे प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचा मार्ग सुकर झाला हे नाकारता येणार नाही. मुंबई महानगर क्षेत्राचा चहूबाजूंनी विकास होत असताना भूमिपुत्रांना विमानतळ नामकरणाच्या आंदोलनाद्वारे आपले अस्तित्व दाखवून दिले आहे. एकनाथ शिंदे यांच्या बंडानंतर अडचणीत सापडलेल्या शिवसेनेने या कठीण समयी आगरी-कोळी नेत्यांनाच साद घालण्यास सुरुवात केली आहे. शिंदे यांच्या बंडानंतर सुरुवातीचे काही दिवस ठाणे जिल्ह्यात शुकशुकाट पसरला होता. ठाणे शहरातील पक्षाचे बहुतांश पदाधिकारी, माजी नगरसेवकांनी शिंदे यांची साथ धरली आहे. असे असले तरी जिल्ह्यातील काही बडे आगरी नेते मात्र 'मातोश्री'वर थेट उद्धव यांच्या भेटीस जाऊ लागल्याने विमानतळाच्या नामकरणाच्या मुद्द्यावरून शिवसेनेने शिंदे यांनाच अडचणीत आणणारी खेळी खेळली आहे. कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार सुभाष भोईर, रायगड जिल्ह्याचे माजी जिल्हाप्रमुख बबन पाटील, जिल्हाप्रमुख शिरीष घरत, ठाण्यातील शिवसेनेचे दिवंगत नेते अनंत तरे यांचे बंधू संजय, बदलापुरात वामन म्हात्रे, नवी मुंबईतील द्वारकानाथ भोईर, एम. के. मढवी यासारख्या नेत्यांना 'मातोश्री'वरून निमंत्रण धाडले जात आहे. म्हणूनच विमानतळाच्या नामकरणाचा मुद्द्यावरून शिंदे यांनाच अडचणीत आणण्याची खेळी 'मातोश्री'वरून खेळली जात असल्याची चर्चा आहे.



सुधीर कोर्टीकर,
संपर्क क्र. 9765553312

# ।। मेघदूतातील काव्यरसाचं सौंदर्य ।।

आधुनिक केसरी

**महाकवी कालिदासांसारख्या अलौकिक प्रतिभावान शब्द प्रभूंचे शब्द जेंव्हा मेघदूतासारख्या काव्यरसांची उधळण करतात. तेव्हां असं अवर्णनीय मेघदूत वाचताना आपुल्या अंतरंगातील भावतरंग अत्यंत तरल होऊन जातात. त्यांच्या काव्यरसाचं निखळ सौंदर्य शब्द शब्दांतून व्यक्त होतं जातं. मग अशा काव्यरचनेच्या शब्द, शब्दांचा अर्थ लावताना वाचणाऱ्या व्यक्तिंच्या अंतरमनास ते शब्द स्पर्शून गेलेले असतात. वाचणाऱ्या रसिक वाचकांचे शब्दही अशावेळी निशब्द होऊन जातात. महाकवी कालिदासांनी मेघदूता सारख्या महाकाव्याची सुगंधीत फुलं आपल्या साऱ्यांच्याच ओंजळीत भरभरून दिलेली आहेत. त्यांच इतक्या वर्षात निर्माल्य झालेलं असलं तरी त्याचा सुगंध हा साऱ्यांच्याच घरांमधून दरवळत राहिलेला आहे हेच खरं.**

ब्रह्मवैवर्तपुराणातील एका कथेवर प्रेरित होऊन महाकवी कालिदास यांनी मेघदूत हे महाकाव्य लिहिले असे मानले जाते. महाकवी कालिदासाच्या मेघदूत काव्य रचनेचा कालखंड हा गुप्तकालखंडातील असवा. म्हणजेच इसवीसनाचे चवथे ते सहावे शतक असावे असा उल्लेख वाचावयास मिळतो. मंदाक्रांता वृत्तात लिहिलेल्या या महाकाव्याचे पूर्वमेघ नि उत्तरमेघ असे दोन भाग पाडण्यात आलेले आहेत.

मेघदूताची ही कथा देखील खूपच मनोरंजक नि भावपूर्ण अशी आहे. एका यक्षाला शाप मिळाल्याने त्याला त्याच्या पत्नी पासून विरह प्राप्त होतो. त्यायक्षाला आपल्या पत्नीपासून खूप  दूर रामगिरी पर्वतावर रहावें लागते. तर त्यात क्षणांची पत्नी ही त्यावेळी हिमालयाच्या कैलास पर्वतावरील वसलेल्या अलका नगरीत रहातं असते.

आपल्या पत्नीच्या विरहामुळे व्याकुळ झालेला रामगिरी पर्वतावर उदासीन झालेला यक्ष  आषाढ मासाच्या प्रथम दिवशी आपल्या पत्नीच्या आठवणी मध्येच रममाण होऊन गेलेला आहे. रामगिरी पर्वतावरुन उत्तरेकडे जाणाऱ्या मेघाला तो पाहतो...नी मग त्यामेघाला सांगतो माझ्या पत्नीला माझ्या ह्रदयातील तिच्या विषयीच्या माझ्या भावना काव्य रसातून तू पोहंचव...हा भावपूर्ण संदेशातूनच या अलौकिक मेघदूत महाकाव्याची निर्मिती महाकवी कालिदास यांनी निर्माण केलेली आहे असे समजले जाते.

कवी कालिदासांच्या मेघदूत या काव्यखंडाच्या पूर्वमेघाच्या पहिल्या भागात रामगिरीपासून अलकानगरीत जाणाऱ्या मार्गाचे विलक्षण सुंदर वर्णन केलेले आहे. कवी कालीदासानी त्या यक्षाच्या भावभावनांचा विचार करुन काव्य रसाची केलेलीं ही निर्मिती अवर्णनीय आहे. रामगिरीपासून ते अलकापुरीकडे जाणाऱ्या मार्गांवर किती विलोभनीय सृष्टी सौंदर्य आहे. फळा-फुलांनी ते पर्वत कसे सजलेले आहेत. पर्वतरांगातून वाहणाऱ्या विषाल नद्या, अद्भुत अशी जंगलाची सृष्टी अशा अलौकिक निसर्गाच्या सान्निध्यात वसलेली विलोभनीय नगरे असं मंत्रमुग्ध करणारं निसर्गाचं, वसुंधरेचं अलौकिक रुप आपल्या शब्दसौंदर्यातूंन भावपूर्णतेनं चितारलेलं आहे.

मंत्रमुग्ध करणाऱ्या निसर्गाच्या बरोबरच अनेक नगरांचे सौंदर्यपूर्ण वर्णन कवी कालिदासांनी



त्यांच्या मेघदूतामध्ये केलेलं आहे. मेघदूतातील या काव्य रसात केवळ वसुंधरेच्या रुपाचं वर्णन आपणास वाचावयास मिळते असं नाही तर अगणीत प्रकारच्या फुलांचे, वनस्पतींचां परिचय कालिदासांनी रसपूर्ण शब्दांमधून मेघदूतात करुन दिलेला आहे. मेघदूतांसारख्या महाकाव्याची अतिशय रसपूर्ण शब्दांमधून त्याची उकल मराठीमधील अनेक मोठ्या साहित्यिकांनी मोठ्या कवीवर्यांनीही केलेलीं आहे.

कुसुमाग्रज, शांता शेळके, बा. भ. बोरकर, कृष्णशास्त्री चिपळूणकर, सी. डी. देशमुख, वसंत बापट अशा अनेक ज्येष्ठ कविवर्यांनी ज्यांना मेघदूत जसे भावले तसे त्यांनी त्यांच्या शब्दांमधून त्यांचे विलक्षण भावपूर्ण लेखन केलेलें आपणांस वाचावयास मिळते. हिरव्या पिवळ्या कदंब पुष्पातील पाहुनी केसर नवकदलीचे सेवुनि अंकुर नदीकिनाऱ्यावर.. गंधवती धरतीचा हुंगित वास वाढता वनी सुचित करितील. कवी कुसुमाग्रजांनी मेघाला उद्देशून असलेल्या श्लोकाचा अनुवाद आपल्या सुंदर शब्दांमधून अधोरेखित केलेला आहे. उन्हाळ्यात फुलणारी कुड्याची फुलं पावसाळ्यात देखील असतात. याच फुलांनी मेघांचे स्वागत केले जातं.

रामगिरी पर्वतावरुन जाणाऱ्या म्हणजेच सध्याच्या नागपूर जवळच्या रामटेक पर्वतावरुन जाणाऱ्या मेघाच्या मार्गात आंब्याच्या मोहरांनी बहरलेला आम्रकुट पर्वत येतो. आम्रकुट म्हणजेच नर्मदा नदीचे उगमस्थान असलेले अमरकंटक होय. अशा पर्वतांच्या रांगातील वनांमध्ये कदंब पुष्पांचा, कर्दळीच्या पुष्पांचाही संदर्भ कवीवर्य कुसुमाग्रजांनी आपल्या श्लोकांच्या अनुवादात केलेला आहे.

धाडू कांते कुशल, भिजल्या श्रावणी धीर द्याया
या भावें तो फुलुनी सजला, त्याजला आळवाया
वाही ताजी कुटज कुसुमे

बा.भ.बोरकर वरील श्लोकात सांगतात रामगिरी पर्वतावरुन जाणाऱ्या मेघाला पाहून विरहानी व्याकुळलेल्या यक्षाच्या मनात आषाढातील पहिल्या दिवशी पर्वतावरुन जाणाऱ्या मेघाला पाहून आपल्या पत्नीला संदेश पाठविण्याचा विचार येतो. मग तो यक्ष कुड्याची म्हणजेच कुटजाची फुलं देवून स्वागत करतो.

मेघदूताच्या महाकाव्यात महाकवी कालिदास आपल्या काव्यरसाची उधळण करताना मेघाच्या मार्गात वाहणाऱ्या नदीच्या काठावर रम्य जाई-जुईचे ताटवे आहेत. त्यांच्या नाजुक कळ्यांवर पहिल्या पावसाच्या सरी हळुवारपणे जणू शिंपडतच आहेत. तसेच या मेघांबरोबर वाहणारे वारे हे नदी तिरावरील उंबराची फळे पिकवीत जातं आहेत.

महाकवी कालिदास आपल्या मेघदूतात मेघाच्या मार्गात दशपुरनगरीतील भामिनीच्या नेत्रविभ्रमाची तुलना कुंदफुलांवर विहार करणाऱ्या भ्रमराशी करीत आहे. हा मेघ विहार करीत करीत असताना त्यांच्या मार्गाच्या शेवटी उंच उंच अशा देवदार वृक्षांच्या घनदाट रांगा हिमालयाच्या पायथ्याशी दिसतात.

त्यानंतर मानससरोवरांवरती विहार करणाऱ्या पांढऱ्याशुभ्र हंसाचाही उल्लेख कालिदाससांनी केलेला आहे.

मानससरोवरात फुललेली कमलपुष्पे..विहार करणारे हंस यांचे रसपूर्ण शब्दांमधून मेघदूतात केलेले वर्णन वाचून समोर संपूर्ण दृष्यच तरलतेनी उभं राहून जातं.

उत्तरमेघात अर्थात मेघदूताच्या दुसऱ्या भागात कालिदासानी संपूर्ण जनजीवनावर दृष्टीक्षेप टाकला आहे. अलकानगरीच्या संपूर्ण परिसराचे जनजीवन यक्ष त्याची पत्नी तिचे तिच्या बरोबरीनेच अलका नगरीतील स्त्रियांची विविध आभुषणे, अनेक अलंकार, स्त्रियांची वस्त्र प्रवरणे, सुगंधीत द्रव्ये, सुगंधीतपुष्पे, विविध मदिरा हे सारं सारं अलकानगरीत वाढणारा कल्पतरुच साऱ्यांना प्रदान करतो असं यक्ष म्हणतो...हा कल्पतरु म्हणजेच मंदार वृक्ष आहे. हाच मंदार वृक्ष माझ्या कांतेनी म्हणजेच माझ्या पत्नीनेच वाढविलेला आहे, असेही यक्ष सांगून जातो. सूर्योदयाच्या समयी सकाळच्या वेळी मंदाराची सुंदर पुष्पें जमीनीवर पडलेली दिसली तर... रात्रीं याच मार्गावरुन अधिर झालेल्या रमणीय गेलेल्या आहेत...असे यक्ष सहजतेनी सांगून जातो. यक्षाच्या घरांजवळ अनेक बकुळांचे नि अशोकाचे वृक्ष लावलेले आहेत. पण रमणींच्या पायांच्या टाचा लागल्याशिवाय अशोक वृक्ष फुलत नाही तर रमणींनी मद्याच्या चुळा या बकुळीच्या वृक्षाला मारल्याशिवाय तो बकुळ वृक्ष फुलत नाही... असंही एक वेगळं वर्णन कालिदासाच्या मेघदूतामध्ये त्यांनी केलेलं आहे.

सरतेशेवटी यक्ष त्या मेघांना सांगतो... अलकानगरीत सरळपणे वाढलेल्या देवदार नि सरलतरुंचा सुगंध घेऊन दक्षिणेकडून जे वारे येतात...या वाऱ्यांना तिचा स्पर्श झालेला असेल म्हणूनचं मी त्यांना आलिंगन देऊन कवटाळतो...असे माझ्या पत्नीची भेट झाल्यावर तिला तू आवर्जून सांगावेसे असेही यक्ष मेघांना सांगण्यास विसरत नाही...

कालिदासाच्या लेखणीतून साकारलेले हे मेघदूत वाचताना कालिदासाचे निसर्ग प्रेम.. कालिदासाची सौंदर्यदृष्टी.. त्या कालखंडातील येणारी फुले, वृक्ष, बहरलेल्या ऋतूचक्राचे त्यांचे निरीक्षण, त्याचा अभ्यास सारंच अवर्णनीय नि आकाशाला गवसणी घालणारंच आहे असंच वाटून जातं. आपल्या मराठी साहित्यातील मोठ्या कवींनी कवी कालिदासांच्या मेघदूताचा अनुवाद करुन जणू स्वर्गलोकातील काव्यरसाचे रसामृताचे कलशच भरभरून भूलोकांच्याकडे "घेशील तू किती दोन करांनी" म्हणत त्यांच्या हाती दिलेले आहेत.



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

# पालखी मेळावा : महाराष्ट्राचे वैभव!

आधुनिक केसरी

**संत ज्ञानदेवांनी भागवत धर्माची पताका खांद्यावर घेऊन सर्व जातीपातीच्या समाजाला पालखी सोहळ्यात सामील करून घेतले.  हेच व्यापक स्वरूप जपत एकनाथ महाराज, तुकाराम महाराज यासारख्या संतांनी वारीची परंपरा पुढे चालवली. गेली कित्येक शतके सुरू असलेली ही महाराष्ट्राची परंपरा आता देशातच नव्हे तर विश्वात लोकप्रिय झाली आहे. संपूर्ण महाराष्ट्रातून वारकरी व भाविक वारीमध्ये सहभागी होतात. महाराष्ट्रातूनच नव्हे तर गुजरात, आंध्रप्रदेश, मध्यप्रदेश, कर्नाटक, तेलंगणा या राज्यातूनही लोक वारीमध्ये सहभागी होतात.**

आषाढ महिना सुरू होताच वेध लागतात ते पंढरीच्या वारीचे! लाखो वारकरी देहू आणि आळंदीत जमा होतात. डोईवर तुळशी वृंदावन व विठ्ठल रुखमाईच्या मूर्ती, हाती टाळ मृदुंग, मुखी विठ्ठल, विठ्ठल जयहरी विठ्ठलाचा गजर करीत, ज्ञानोबा- तुकारामांचा जयघोष करीत व खांद्यावर भागवत धर्माची भगवी पताका फडकवीत विठुरामाच्या भेटीसाठी लाखो वैष्णवांचा मेळा निघतो हे दृश्य डोळ्यांचे पारणे फेडणारे असते. आषाढी वारी म्हणजे महाराष्ट्राचा लोकोत्सव!

पालखी सोहळा हे महाराष्ट्राचे वैभव आहे. तेराव्या शतकात ही परंपरा असल्याचे उल्लेख सापडतात. संतश्रेष्ठ ज्ञानोबा माऊलींच्या घराण्यात पंढरीच्या वारीची परंपरा होती. त्यांचे वडील वारीला जात असल्याचा उल्लेख आढळतो. संत ज्ञानदेवांनी भागवत धर्माची पताका खांद्यावर घेऊन सर्व जातीपातीच्या समाजाला पालखी सोहळ्यात सामील करून घेतले.  हेच व्यापक स्वरूप जपत एकनाथ महाराज, तुकाराम महाराज यासारख्या संतांनी वारीची परंपरा पुढे चालवली. गेली कित्येक शतके सुरू असलेली ही महाराष्ट्राची परंपरा आता देशातच नव्हे तर विश्वात लोकप्रिय झाली आहे. संपूर्ण महाराष्ट्रातून वारकरी व भाविक वारीमध्ये सहभागी होतात. महाराष्ट्रातूनच नव्हे तर गुजरात, आंध्रप्रदेश, मध्यप्रदेश, कर्नाटक, तेलंगणा या राज्यातूनही लोक वारीमध्ये सहभागी होतात. आतातर परदेशातून लोक खास वारी अनुभवण्यासाठी महाराष्ट्रात येतात. दिवसेंदिवस वारीतील वारकऱ्यांची संख्या वाढत चालली आहे. १९६५ च्या सुमारास आळंदीच्या पालखीमध्ये पाच हजार लोक सहभागी झाल्याचा उल्लेख दि. ब. मोकाशी यांच्या पुस्तकात आढळतो आज ती संख्या लाखोंच्या घरात पोहचली आहे.  वृद्धांप्रमाणे तरुणही आता वारीत सहभागी होत आहेत. सहकुटुंब वारी करणाऱ्यांची संख्याही वाढली आहे. कुठलीही जाहिरात न करता, मार्केटिंग न करता  लाखो भाविक वारीत सहभागी होतात. वारी म्हणजे नियोजनाचे सर्वोत्तम उदाहरण! मार्च महिन्यातच दिंडीचे नियोजन होते. दिंडीतील सहभागी वारकरी, आचारी, शिधा, मुक्कामाची सोय याचे सर्व नियोजन मार्च महिन्यातच होते. मार्च महिन्यात सुरू झालेले हे नियोजन दिंडी



पुन्हा गावी येइपर्यंतचे असते. वारीतील शिस्त तर काय वर्णवावी! कोठेही गडबड गोंधळ नसतो. स्वयंशिस्तीने चालणाऱ्या वारकऱ्याला आस असते ती फक्त विठुरायाच्या भेटीची! लाखो वारकरी असूनही त्यांच्यातील शिस्त कधी बिघडत नाही. त्यांची शिस्त समाजाला दिशा देणारीच असते. पालखी मार्गावर पालख्यांचे दर्शन घेण्यासाठी हजारो भाविक उभे असतात. साधू संत येती घरा.... तोचि दिवाळी दसरा...! ही भावना त्यामागे असते. अनेक सेवाभावी संस्था दिंडीतील वारकाऱ्यांसाठी फराळ व आहाराचे वाटप करतात. शासन स्तरावरून देखील पालख्यांचे योग्य नियोजन केले जाते. पिण्याच्या पाण्याची व पालखी मुक्कामाची यथायोग्य सोय केली जाते.  वारी दरम्यान गृह विभागाकडून चोख सुरक्षा व्यवस्था पुरवली जाते.  आरोग्य विभाग वारकऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी तत्पर असते. तज्ज्ञ डॉक्टरांचे पथक कायम वारकऱ्यांच्या सेवेसाठी उपलब्ध असते. आतातर नेटकरी नेटवरही वारीचे अपडेट देत असतात. फेसबुकसारख्या सोशल मीडियावर देखील आता वारीचा अनुभव घेता येतो त्यामुळे वारीदेखील आता ग्लोबल झाली असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं  ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# मुलांच्या आनंदात घट तर नैराश्यात वाढ



भरत कोळी
बॉक्सिंग प्रशिक्षक, धुळे


आधुनिक केसरी

**"ऑनलाईन शिक्षण प्रणाली शालेय स्तरावर योग्य की अयोग्य" यावरही सखोल अभ्यास करणं मुलांच्या भवितव्यासाठी अतिशय महत्त्वाचे आहे असं मला वाटतं कारण या दीड वर्षांच्या कालखंडातचं मुलांचा आनंद हरला तर नैराश्य जिंकला" अशी परिस्थिती माझ्या जिल्ह्यात ९०% च्या आसपास निर्माण झाली हे माझ्या निरीक्षण अनुभव अभ्यासातून सांगतोय. खरं तर शालेय स्तरावर (प्राथमिक, माध्यमिक) ऑनलाईन शिक्षण प्रणाली ही फक्त आणि फक्त प्राथमिक स्वरूपात असावी किंवा "ओळख ऑनलाईन जगाची" अशा काही लेव्हलमध्ये ऑनलाईन शिक्षण प्रणाली हवी**

२३ मार्च २०२० पासून महामुर्ख कोरोनाचे महाभयंकर संकट इतकं घातक ठरेल असं कोणाला वाटलं नव्हतं, कारण ह्या संकटाचा फटका संपूर्ण जगाला बसला आणि बऱ्याच देशांना ह्या महामूर्ख कोरोनामुळे आर्थिक संकटाशी दोन-दोन हात करावे लागले तर काही देशांच्या आरोग्य व्यवस्थेने कोरोनासमोर हात टेकले अशीही विचित्र परिस्थिती मागच्या काही महिन्यांपूर्वी समोर होती, बातम्या असो की इतर सोशल मीडिया असो त्या माध्यमातून फक्त आणि फक्त कोरोनाविषयीचं चर्चा चारही दिशांना सुरू होती आणि याच काळात मानव आपलं स्वतःचे आरोग्य सुरक्षित राखण्यासाठी वेगवेगळे पर्याय शोधू लागला. खरं तर उशीर लागला पण मानवाला आरोग्याबाबत जाग आली. म्हणून मी नेहमी सांगतो की शत्रू हा मार्गदर्शकही असू शकतो असो.

"देवा पांडुरंगा मला सुखी ठेव आणि आनंददायी जीवनशैली जगू दे." असे अनेक जण प्रार्थना करताना मला दिसतात त्यात माझाही समावेश आहे यात अजिबात शंका नाही, पण मी स्वतःला सुखी ठेवण्यासाठी आणि आनंदी राहण्यासाठी मैदानावर शारीरिक हालचाली नेहमी करतो त्यामुळे माझ्या दैनंदिन व्यवहारात थकवा व नैराश्यासारखी लक्षणे सहसा येत नाहीत, कारण मी आनंदी जीवनशैलीसाठी सतत प्रयत्न करतो. माझा देवांवर विश्वास, श्रद्धा प्रचंड आहे, पण प्रयत्न करणं हे आपल्या हातात आहे हे लक्षात घेत आनंददायी जीवनशैली व उत्तम आरोग्यासाठी शारीरिक हालचालींचा समावेश (व्यायाम) करा म्हणजे "आनंदात वाढ आणि नैराश्यात घट दिसून येईल." पण कोरोनात काळात जवळपास हे चित्र जरा उलट होतं. मुलांच्या बाबतीत तर हे चित्र चिंता करण्यासारखेचं आहे, विशेष म्हणजे पालकांनी याकडे दुर्लक्षचं केलं की काय असं वारंवार मला वाटतं. पालक वर्गाने "मुलांच्या सुदृढ आरोग्यासाठी" काळजी घ्यावी कारण भविष्यात कोरोनासारखे रोग कधीही अतिथी म्हणून येतील हे सांगता येणं कठीण आहे. मोलाचा सल्ला म्हणून "मुलांना मैदानाकडे पाठवा ताणतणाव सारख्या गंभीर समस्यापासून दूर ठेवत आनंदात वाढ करा आणि नैराश्यात घट करा."

कोरोनाच्या संकटामुळे शैक्षणिक व्यवस्था ऑनलाईन स्वरूपात सुरू होती, साधारणपणे शाळा बंद होऊन दीड वर्षे उलटली पण शाळेचे दरवाजे विद्यार्थ्यांसाठी बंद होते. असो पण मुलांचे शैक्षणिक नुकसान झाले नाही पाहिजे, पण अनेक खाजगी शाळेतील विद्यार्थ्यांचे फी न भरल्यामुळे ऑनलाईन वर्गात त्यांना बसू दिले नाही अर्थात त्यांचे शैक्षणिक नुकसान झाले असे अनेक ठिकाणी चित्र दिसले. "मग हा शैक्षणिक छळ का



पिळवणूक" असा मला पडलेला खास प्रश्न हा सतत माझ्या डोळ्यासमोर फिरत असतो. यावर मार्ग शोधण्याचा नेहमी प्रयत्न करतो, पण ही सर्व प्रक्रिया गुंतागुंतीची मला वाटते. त्याचबरोबर "ऑनलाईन शिक्षण प्रणाली शालेय स्तरावर योग्य की अयोग्य" यावरही सखोल अभ्यास करणं मुलांच्या भवितव्यासाठी अतिशय महत्त्वाचे आहे असं मला वाटतं. कारण या दीड वर्षांच्या कालखंडातचं मुलांचा आनंद हरला तर नैराश्य जिंकला" अशी परिस्थिती माझ्या जिल्ह्यात ९०% च्या आसपास निर्माण झाली हे माझ्या निरीक्षण अनुभव अभ्यासातून सांगतोय. खरं तर शालेय स्तरावर (प्राथमिक, माध्यमिक) ऑनलाईन शिक्षण प्रणाली ही फक्त आणि फक्त प्राथमिक स्वरूपात असावी किंवा "ओळख ऑनलाईन जगाची" अशा काही लेव्हलमध्ये ऑनलाईन शिक्षण प्रणाली हवी. निरंतर चालणारी ऑनलाईन शिक्षण प्रणाली विद्यार्थ्यांसाठी शारीरिक व मानसिक आरोग्याच्या दृष्टीने डोकेदुखी ठरेल आणि "भविष्यात शाळेच्या बाजूला एक दवाखाना उघडावा लागेल" अशी परिस्थिती निर्माण होऊ शकते. म्हणून ऑनलाईन शिक्षण प्रणाली शालेय स्तरावर किती प्रमाणात हवी याबाबत शाळेच्या व्यवस्थापनेने व अभ्यासकांनी याबाबत सखोल अभ्यास करावा. "२१ व्या शतकातील आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात ऑनलाईन प्रणाली शिकणे अतिशय महत्त्वाचे आहे, पण योग्य तो स्तर हवा जेणेकरून मानसिक ताणतणावाच्या समस्या निर्माण होणार नाही."

खरं तर आजही निमशहरी व ग्रामीण भागातील शाळांमध्ये ऑनलाईन शिक्षण कसे शिकवावे याविषयी कोणत्याचं प्रकारे अगोदर पूर्व नियोजन व प्रशिक्षण शिक्षकांना दिले नसल्याने कोरोना काळात ऑनलाईन शिक्षण प्रणाली वापरताना बराच गोंधळ उडाला. खरं तर ज्यांना शिकवायचे आहे त्यांच्याकडे ऑनलाईन शिक्षण घेण्यासाठी सुविधा आहे का...? हा कोणीच विचार केला नाही. ग्रामीण भागात नेटवर्कची प्रचंड कमतरता, संगणक हे मध्यम व गरीब कुटुंबांना न परवडणारे साधन, स्मार्ट फोनमध्ये रिचार्ज नसल्याने ऑनलाईन वर्गात सहभाग घ्यायचा तरी कसा अशा अनेक समस्या समोर आल्या. ऑनलाईन शिक्षण प्रणाली ही केवळ "काडीला औषध लावणे" या वाक्याप्रमाणे मर्यादित राहिली असं मला वाटतं."ह्या कोरोना काळात बऱ्याच शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी तारेवरची कसरत केली." त्या सर्व शिक्षकांचे आमच्या क्रीडा परिवाराकडून अभिनंदन व लाख-लाख सलाम. अशा "अनेक शिक्षकांनी आपल्या सक्रिय अनुभव संकल्पनेतून शिक्षण विद्यार्थ्यांच्या दारी पोहचविले." नंदुरबार जिल्ह्यासारख्या आदिवासी भागात शिक्षण हे ऑनलाईन प्रणालीविना पाडापर्यंत पोहचू शकलं, पण "शालेय स्तरावरील विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिक्षण प्रणाली ही मर्यादित असावी जेणेकरून त्याचा सर्वांगीण विकास साधता येईल. "कोरोनाच्या सुरुवातीच्या काळात असं वाटत होतं की शाळा लवकरचं सुरू होतील आणि पुन्हा वर्गात अध्ययन-अध्यापन घडून येईल या आशेवर दीड वर्ष गेली पण शाळा अजून भरली नाही शेवटी मध्यंतरीच्या काळात ऑनलाईन शिक्षण प्रणालीचा उपयोग करावा लागला आणि ऑनलाईन वर्ग भरायला लागले. सुरुवातीला ऑनलाईन शिक्षणाला चांगला प्रतिसाद मिळाला.विद्यार्थी व पालकांनाही याबाबत चांगलीच उत्सुकता निर्माण झाली होती, पण याचे काही दिवसांनी नकारात्मक परिणाम दिसू लागल्याने अनेक विद्यार्थी व पालकांनी ऑनलाईन शिक्षण प्रणालीकडे पाठ फिरवली यात अजिबात शंका नाही. खरं तर तर मोबाईल किंवा संगणकाच्या स्क्रीनमुळे डोळ्याच्या समस्या निर्माण झाल्या. आरामदायी जीवनशैलीची सवय लागली. मानसिक आरोग्याच्या समस्या निर्माण झाल्या. चिडचिड करणे, एकांत राहणे असे काही, ताणतणाव वाढला. शारीरिक हालचालींत कमतरता निर्माण झाल्या. शोधकवृत्तीला चालना मिळाली नाही. आकलन क्षमता कमी झाली. सामाजिक मूल्याचा विकास झाला नाही. वाचन-लिखाण याचा सराव कमी झाला. कलागुणांचा विकास बहुतेक करून ह्या काळात कमी झाल्या आणि ज्या ठिकाणी शारीरिक व मानसिक क्षमता लागतात त्या मैदानावर जाण्याची सवय गेली आणि मोबाईलच्या मैदानावर खेळण्याची सवय मुलांना जास्त लागली. म्हणजे एकंदरीत पाहता शालेय मुलांचे आरोग्य धोक्यात ह्या ऑनलाईन शिक्षण प्रणालीमुळे झाले असंही म्हणता येणार नाही, तर ह्या "ऑनलाईन शिक्षण प्रणालीचा अतिवापरामुळे मुलांचे शारीरिक व मानसिक आरोग्य धोक्यात आहेत." पालकांनी याकडे लवकर लक्ष केंद्रित केले पाहिजे, खाजगी शाळा आपल्या स्वार्थासाठी बहुतेक करून ऑनलाईन शिक्षण प्रणालीचा प्रयोग प्रचंड राबवतील पण आरोग्य तुमच्या मुलांचे धोक्यात राहील हे लक्षात घ्या. मी कोणत्याही खाजगी शाळेवर टीका करत नाही तर परिस्थिती दाखवत आहे म्हणून कोणीही वैयक्तिक घेऊ नये. शालेय स्तरावर मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी मूल्याधिष्ठित शिक्षण हवं आणि छोट्या-छोट्या संकल्पना स्पष्ट होतील असे उपक्रम राबवून मुलांना शारीरिक व मानसिक सक्षम करण्यासाठी प्रत्यक्ष शिक्षण प्रणालीवर भर हवा.

# स्त्री सौंदर्य शाप की वरदान!



सुनील शिरपुरे, यवतमाळ
संपर्क क्र. 7057185479

आधुनिक केसरी

**दिसायला सुंदर असणे म्हणजे एक शाप आहे असं ती मानते. ती स्वत: दिसायला सुंदर आहे. त्यामुळे तिच्या घरच्यांना तिचा अभिमान आहे. पण तिला मात्र यामुळे काहीच फायदा झाला नाही. तिला हवे तसे प्रेम कधी मिळालेच नाही. तिच्या बाजूला नेहमी मुलांचा घोळका असायचा. पण ते केवळ तिच्या सौंदर्याकडे आकर्षित झालेले होते. कोणालाच तिच्यातील ती किंवा तिच्यातील खास काही आवडत नव्हतं. आपण एका सुंदर मुलीसोबत फिरतो किंवा आपली गर्लफ्रेंड ही सुंदर आहे. एवढेच त्यांना जगाला दाखवायचे होते. हेच कारण आहे की ती आजवर सिंगल राहिली.**

पण हो, असे नाही की ती कोणत्याच मुलाला संधी दिली नाही किंवा पारखून घेतले नाही. कॉलेजमध्ये ती एका मुलाला डेट केले. पण नंतर त्याचा खरा चेहरा समोर आला. तो केवळ कॉलेजच्या सुंदर मुलीचा बॉयफ्रेंड होता यावं म्हणून तित्यासोबत होता. जे कळताच ती नाते तोडले. त्याच्यामुळे भविष्यात पुन्हा ती कुणालाही डेट न करण्याची शपथ घेतली. ती अजूनही अविवाहित का आहे? असे लोक तिला अनेकदा विचारतात. ती स्वतःसाठी जोडीदार का निवडत नाही? पण काही काळात सारं काही बदणार आहे, याची तिला फारशी कल्पना नव्हती.

कॉलेजनंतर ती एका फर्ममध्ये काम करायला सुरुवात केली. तिला वकील बनायचे होते आणि त्या दिशेने ती तिचे काम निवडले. तिला चांगला बॉस आणि चांगली कंपनी मिळाली. तीसुद्धा मन लावून काम करायची. त्यांचा हा बॉस खूपच चांगला होता. ती इतकी सुंदर होती आणि ते सुद्धा तरुणच होते. पण कधीच त्यांनी बॉस असल्याचा फायदा घेऊन तिच्याशी फ्लर्टिंग केली नाही. कधीच चुकीचा व्यवहार केला नाही. कदाचित याच गोष्टीने तिला त्यांच्या दिशेने आकर्षित केले.

ती त्यांना नोटीस करायला सुरुवात केली. त्यांनी अनेक केसेस एकत्र लढले, ती त्यांना असिस्ट केली. ते तिच्या कामाने खूप खुश असायचे. अनेकदा त्यानी सगळ्यांसमोर तिचे कौतुक देखील केले होते. एकदा एका केस नंतर त्यांनी त्यांच्या सर्व कर्मचाऱ्यांना डिनरला नेले. तिथे त्यांनी त्यांच्या वैयक्तिक जीवनातील गोष्टी उलगडू लागले. तेव्हा एकाने तिला प्रश्न केला की, "ती अजून सिंगल का? ती



लग्न का केले नाही?" यावर ती काही म्हणण्याच्या आतच बॉस म्हणाले की, "वय झाले म्हणून लग्न करायला हवे असे काही नाही. मी सुद्धा अविवाहित आहे. मनासारखा जोडीदार कधी न कधी मिळेल या आशेवर." त्यांचे हे उत्तर ऐकून ती नकळतच खूप इम्प्रेस झाली.

इतरांनी तिला केलेल्या प्रश्नामुळे ती रागात बाहेर आली. पण हळूहळू तिच्या मनात बॉस विषयी प्रेम निर्माण होऊ लागले. कदाचित ही गोष्ट त्यांच्या देखील लक्षात आली असावी. म्हणून एकदा त्यांनी तिला लंच ऑफर केला. त्यांनी बाहेर गेले आणि तिथे त्यांनी तिला थेट लग्नाची मागणी घातली. तिला जरी ते आवडू लागले असले, तरी एवढा मोठा निर्णय लगेच घेणे तिला शक्य नव्हते. ती पुन्हा माणूस ओळखण्यात चुकली असे तिला वाटले आणि ती रागाने बाहेर आली. पण नंतर राग शांत झाल्यावर ती पुन्हा आत गेली आणि त्यांची माफी मागितली. त्यांना आदराने आपला नकार दिला.

ती रागावली हे पाहताच त्यांनी तिला समजवण्याचा प्रयत्न केला व ते म्हणाले, "मी काय म्हणतो ते तरी ऐकून घे. तुझा कामामधील प्रामाणिकपणा पाहूनच मी इम्प्रेस झालो होतो. हो मी तुझ्या सौंदर्याच्या प्रेमात पडतो. पण मी तुला पहिले ओळखून घेतलं आणि मगच तुला लग्नाची मागणी घातली. मला वाटतं तू एकटी आहेस आणि मी देखील एकटा आहे. आपले विचार जुळतात. आपण एकमेकांना समजून घेऊ शकतो आणि म्हणून मी मागणी घालण्याची हिम्मत केली. बाकी निर्णय तुझा असेल." त्यांचे हे बोलणे ऐकून ती अंतर्मुख झाली आणि तिला त्यांचा विचार पटला. अशाप्रकारे त्यांनी तिचे मन जिंकले.

अखेर ती सुद्धा त्यांना संधी देण्याचे ठरवली. त्यांनी एकमेकांना वेळ दिला. खूप दिवस एकमेकांसोबत काढले. तेव्हा जाऊन तिला खात्री पटली की, त्यांचे पटू शकते आणि मग त्यांनी लग्नाचा निर्णय घेतला. ते भलेही वयाने तिच्यापेक्षा मोठे असतील पण तिला आयुष्यभर सांभाळण्याची धमक त्यांच्यात होती. आज त्यांच्या लग्नाला तीन वर्षे पूर्ण झाली आणि ते खूप खुश आहेत. नात्यामध्ये स्थिरता, शांतता हवी. ४० वर्षाच्या बॉससोबत लग्न केले, तिला तिचा निर्णय योग्य वाटतो. खरंच प्रेमाला वयाचे बंधन नसते हेच खरे..!

# मनसोक्त जगणं



आधुनिक केसरी

माणसाने नेहमी आनंदी रहावे. टेन्शन काय रोजच आहे जोपर्यंत श्वास आहे, कूणासाठी ही बदलू नका. हां अवश्य बदला स्वतःसाठी. समोरचा बदलणार नाही म्हणून स्वतःत बदल करणे हे आपल्या जीवनासाठी हिताचे आहे. तो वेगळा वागतो आहे हे कळत असले तरी तुम्ही तुमची जी आनंदी राहण्याची गुरूकिल्ली ही सदैव जतन करून ठेवा. त्याला विस्कळीत होऊ देऊ नका. असेही होऊ शकते तुम्ही करत असलेले कार्य हे समोरच्या व्यक्तीस कुठेतरी मनात आपल्याबद्दल खंत असेल तर ती व्यक्ती आनंदी कशी असेल. तोंडावर मुखवटा चढवून समाजात वावरण्यापेक्षा वास्तविक राहून जगणे कधीही स्वतःच्या तब्येतीसाठी चांगले. सतत मनात कुढत रहाणे हे व्यक्तिमत्त्व लगेच बाहेर पडते आणि ते लक्षात ही पटकन् येते, पण हे सहजासहजी लक्षात येणारा खेळ नाही. समोरच्यास पारखण्यासाठी त्याचा आधी अभ्यास करावा लागतो. तेव्हा तुम्हाला ती व्यक्ती काय आहे हे समजणं कठीण जाणार नाही.

"मनसोक्त जगणे" हे आनंदी जीवनाचे रहस्य आहे आणी ते कसे जगायचे, त्याचा आनंद कसा घ्यायचा हे प्रत्येकावर अवलंबून आहे.

टेन्शन येऊ लागलं नां जागीच बसा मस्तपैकी एक दिर्घ श्वास घ्या आणी आपल्या मनाशी छान आरशात पाहून न्याहाळा. त्यांच्याशी गप्पा करा. पहा हे मनं कसं एकटं जरी असलं नां तरी सुद्धा प्रसन्न रहाते. छंद जोपासा, जी आपणास आवड असेल, अध्यात्मात मन लावा, बाहेर एक फेरफटका मारून या, एखादी स्वतःसाठी कॅडबरी विकत घेऊन मस्त गॅलरीत बसून तीचा आनंद घ्या, मित्रांना फोन करा, मन मोकळं करा, दडवून या मनाला जगू नका. हे जीवन परत नाही, स्वतः आनंदी रहा आणि इतरांनाही तुमच्यापासून आनंदी कसं ठेवता येईल या कलाआपल्यात उपजत करा. मित्र हो मी लिहीत राहणार हे लिखाण काम माझं संपणार नाही. मी नवनवीन विषय आपल्यासमोर घेऊन येत राहील, भेटूत मित्रांनो पुढील याच पानावरती. तो पर्यंत पुढील आपल्या गप्पाचां विषय कोणता असेल या बाबत विचार करा.

**-सौ. भाग्यश्री दायमा**

# योगेश बडगुजरने सर केला १९,३४१ फूट उंचीचा माऊंट किलीमांजारो

## 'बंधमुक्त' काव्यसंग्रह उंच शिखरावरून नेऊन गुरुला वाढिदवसाची भेट

आधुनिक केसरी न्यूज

**धरणगाव :** येथील पी. आर. हायस्कूलचा माजी विद्यार्थी योगेश प्रकाश बडगुजर याने दक्षिण अफ्रिकेतील टांझानिया देशातील माऊंट किली मांजारो या पर्वतावर गिर्यारोहण करुन एक विक्रम प्रस्थापित केला आहे. अफ्रिका खंडातील सर्वात उंच पर्वत शिखर सर करणारा खान्देशातील तो एकमेव गिर्यारोहक ठरला आहे. १९,३४१ फूट अर्थात ५,८९५ मिटर उंच शिखरावर आपल्या गुरुंचा कविता संग्रह "बंधमुक्त" सोबत नेऊन गुरुंना वाढदिवसाची अनोखी भेट दिली. त्याच्या या यशाचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

योगेश बडगुजर हा पी. आर. हायस्कूलचा २०१० चा एसएससी बॅचचा विद्यार्थी आहे. शालेय जीवनात तसेच महाविद्यालयीन जीवनात तो एन.सी.सी. चा कॅडेट होता. अनेक शिबिरातून त्याला साहस करण्याचं वेड लागलं. सैनिक होण्याची त्याची इच्छा होती. मात्र, त्याला मुंबई येथे २०१७ मध्ये फायरब्रिगेडमध्ये फायरमन म्हणून नौकरी लागली. येथूनच त्याने माऊटेनरींगचं प्रशिक्षण घेतलं. प्रथम त्याने सिक्कीम येथील रेनॉक (६५०० फूट) शिखर सर केलं आहे. योगेशने नुकतेच दार्जिलिंग येथे १४ मे ते १० जून असे २८ दिवसांचे बेसिक माऊटेनरींगचं प्रशिक्षण पूर्ण केले. माऊंट किलीमांजरोसाठी तो २० जूनला अफ्रिकेत गेला. २२ जूनला शिखर सर करायला सुरवात केली. तीन टप्यात त्याने २५ जून शनिवार रोजी सकाळी ७.४५ वाजता शिखर सर करुन आपली उपस्थिती तेथील अभिप्राय बुकात नोंद केली. योगेशने मोहिम पूर्ण झाल्यावर शिखरावर आपल्या देशाचा तिरंगा, आपल्या गुरुंचा काव्यसंग्रह "बंधमुक्त" आणि त्याला या मोहिमेला सर्वतोपरी सहकार्य करणाऱ्या महाजन ऑप्टिकल्सचे बॅनर झळकावून आपला आनंद साजरा केला. हा आपल्या जीवनातला सर्वोच्च आनंद असल्याचे योगेश भारावून बोलत होता. हा पर्वत ज्वालामुखीच्या उद्रेकातून तयार झाला आहे.

योगेशने आपल्या यशाचे श्रेय आई सौ. रत्नाबाई बडगुजर आणि वडिल प्रकाश उत्तम बडगुजर (जळगाव) यांना दिले आहे. शिक्षणासाठी तसेच या मोहिमेसाठी महाजन ऑप्टिकल्सने मानसिक व आर्थिक सहकार्य केल्याचे त्याने नमूद केले. लवकरच योगेश रशिया येथून युरोपातील सर्वोच्च शिखर माऊंट एलब्रुसला (१८,५१० फूट /५,६४२ मिटर) सर करण्यासाठी १५ ऑगष्टला निघणार आहे.

### वाढदिवसाची ही अनोखी भेट -प्रा. चौधरी



**नुकताच माझा ६० वा. वाढदिवस संपन्न झाला. त्या निमित्ताने आपल्या विद्यार्थ्यांने दिलेली ही अनोखी आणि सर्वोत्तम भेट असल्याचे प्रा. बी.एन.चौधरी यांनी नमूद केले. गुरु शिष्याला ज्ञान देतात, घडवतात आणि सर्वोच्च स्थानी पोहोचवतात, हे सर्वश्रुत आहे. मात्र, आपल्या गुरुची "बंधमुक्त" ही साहित्यकृती, त्याच्या शिष्याने सर्वोच्च शिखरावर पोहचवावी ही अद्वितीय घटना आहे, असे ते भारावून म्हणाले.**




# संत कबीर विद्यालयात छत्रपती शाहू महाराज जयंती उत्साहात



आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** संत कबीर विद्यालय नक्षत्रवाडी येथे छत्रपती 'शाहू महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. संत कबीर प्रसारक मंडळाचे अध्यक्ष आयु. विठाबाई माधवराव बोरडे, उपाध्याक्ष आयु. कमलेश माधवराव बोरडे व सचिव ॲड. धनंजय बोरडे यांच्या मार्गदर्शनाखाली संत कबीर विद्यालय नक्षत्रवाडी शाळेचे कर्तव्यदक्ष मुख्याध्यापक पवार एस. बी. व साळवे एस. पी. यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला.

# राज्य बुद्धिबळ : सात वर्षे वयोगटातील मुलांच्या स्पर्धेत राघव पावडे प्रथम

## मुलींच्या गटात मुंबईची अमया रॉय प्रथम

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** पुणे डिस्ट्रिक्ट चेस सर्कल तर्फे आयोजित सिम्बॉयसिस क्रीडा संकुल येथे २५ व २६ जून ह्या कालावधीमध्ये संपन्न झालेल्या राज्य बुद्धिबळ ७ वर्ष वयोगटातील स्पर्धेत पुण्याचा राघव पावडे आठ पैकी सात गुण मिळवून प्रथम विजेता ठरला. कोल्हापूरचा वरद पाटील व्दितीय आला. राघव पावडे हा पुण्यातील वारजे येथील कॅसल चेस अॅकॅडमीचा विद्यार्थी असून अनिल राजे त्याचे बुद्धिबळ प्रशिक्षक आहेत. न्यू इंडिया स्कूलमध्ये राघव ईयत्ता दुसरीत शिकत आहे. शाळेच्या मुख्याध्यापिका देवकी सुतार यांनी राघवचे अभिनंदन केले असून उदयपूर येथे होणाऱ्या राष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. मुलींच्या गटात मुंबईची अमया रॉय प्रथम तर नागपूरची विश्वजा देशमुख द्वितीय आली.

१५ जुलै पासून उदयपूर येथे होणाऱ्या राष्ट्रीय सात वर्षाखालील मुलामुलींचा महाराष्ट्र राज्याचा संघ असा -

**मुलांचा संघ :** राघव पावडे - (७ गुण) प्रथम, पुणे, वरद पाटील - (७ गुण) द्वितीय, कोल्हापूर, श्रेय डोबल - (साडे सहा गुण) तृतीय, ठाणे, दर्श पोरवाल -(साडे सहा गुण)



राघव पावडे

पुणे, राज आरव - (६ गुण) पाचवा, रायगड.

**मुलींचा संघ :** अमया रॉय मुंबई- (६ गुण) - प्रथम, विश्वजा देशमुख नागपूर- (६ गुण)-द्वितीय.

विजेत्यांना प्रमुख पाहुणे सुजनील फार्माचे व्यवस्थापकीय संचालक आशिष देसाई व पुणे क्लब गोल्फ कोर्सचे अध्यक्ष स्वस्तिक सिरसीकर, ग्रँडमास्टर अभिजित कुंटे यांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली. यावेळी आंतरराष्ट्रीय महिला मास्टर मृणालिनी कुंटे, मुख्य पंच विनिता श्रोत्री यांची मुख्य उपस्थिती होती.

# नैसर्गिक मानवाधिकार सुरक्षा परिषद फोरमतर्फे "समाजभूषण पुरस्कार" वितरण सोहळा आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** भारतीय समाजसुधारकांचा आधुनिक काळात विसर पडत चालला आहे. त्यांच्या या कार्याची लोकमानसात जनजागृती व्हावी म्हणून भारतीय समाज सुधारकांपैकी एक असलेले कोल्हापूर संस्थानाचे लोकराजा छत्रपती राजर्षी शाहू महाराज शाहू महाराज होय. 26 जून त्यांच्या जयंतीचे औचित्य साधून विशेष पुरस्कार सोहळा जुलै महिन्यात आयोजित करण्यात आला आहे.

सामान्य जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी व बहुजन समाजाच्या सामाजिक उन्नतीसाठी राजांनी प्रयत्न केले. त्यांनी महाराष्ट्रातील शिक्षण, आरोग्य, शेती, कृषी, सहकार, उद्योग, अंधश्रद्धा, विज्ञान, संगीत, नाट्य, मल्लविद्या, अशा अनेक क्षेत्रात सामाजिक कार्य केले. म्हणून महाराष्ट्राला अशाच तीन समाजसुधारकांचा वैचारिक वारसा लाभल्या असल्यामुळे "फुले -शाहू- आंबेडकरांचा महाराष्ट्र" असे म्हणतात. अशाच प्रकारे आजच्या घडीला महाराष्ट्रातील विविध क्षेत्रातील प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे सामाजिक कार्य करणाऱ्या व्यक्तीला नैसर्गिक मानवाधिकार सुरक्षा परिषद फोरम तर्फे "समाजभूषण पुरस्कार" म्हणून सन्मान करून गौरवण्यात येणार आहे आहे तरी दिनांक १५ जुलै २०२२ पर्यंत प्रमोद रमेश पाटील संपर्क क्रमांक ९८८११९४८१६ यांच्याशी संपर्क करून नामांकन अर्ज १५ जुलैपर्यंत पाठवावेत असे आवाहन करण्यात आले आहे.

# आषाढी एकादशीनिमित्त मायभूमी प्रतिष्ठानतर्फे वक्तृत्व, निबंध स्पर्धा

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** मायभूमी प्रतिषठानतर्फे आषाढी एकादशी व गुरुपौर्णिमेनिमित्त वक्तृत्व व निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेचे विषय खालीलप्रमाणे.

**निबंध स्पर्धा**

छोटा गट - 8 ते 15 वयोगट
शब्दमर्यादा 500 शब्द.
विषय : 1. माझा आवडता गुरू, 2. माझा आवडता सण, 3. माझे आवडते गाव

मोठा गट 15 वर्ष आणि पुढे.
शब्दमर्यादा 1000 शब्द.
विषय : 1. मी पाहिलेला विठ्ठल, 2. माझ्या आयुष्यातील गुरुचे स्थान, 3. भारतीय संस्कृतीत उपास, सण, व्रत वैकल्ये यांचे महत्त्व.



**वक्तृत्व स्पर्धा**

छोटा गट - 5 ते 10 वयोगट, वेळ - 3 मिनिटे.
विषय : 1. माझा आवडता संत, 2. आई - माझा पहिला गुरू, 3. एकादशी दुप्पट खाशी.

**मोठा गट - 10 ते 15 वयोगट,** वेळ : 5 मिनिटे
विषय : 1. पाऊले चालती पंढरीची वाट, 2. माझा आवडता छंद, 3. गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु.



**नियम आणि अटी**

आपले निबंध किंवा वक्तृत्व स्पर्धेचे व्हिडिओ फेसबुकला शेयर करून त्यात खालील ओळ आणि हॅशट्रग टाकावा.

MYभूमी प्रतिष्ठानच्या वक्तृत्व स्पर्धा उपक्रमासाठी WWW.FB.COM/MYBHUMIUSA #MYभूमी_USA #MYBHUMI आणि तीच पोस्ट आम्हाला ईमेल व्हाट्सअप किंवा फेसबुक मेसेंजर मार्फत कन्फर्मेशन साठी पाठवावी.

स्पर्धेसाठी कुठलीही फी नाही, फेसबुक लाईक किंवा किती शेअर केले यावर विजेता ठरवला जाणार नाही, ही स्पर्धा भारत आणि भारताबाहेरील सर्वांसाठी खुली आहे, दोन्ही स्पर्धांसाठी केवळ मराठीतीलच प्रवेशिका ग्राह्य धरल्या जातील. आपल्या प्रवेशिका पाठवण्याची अंतिम तारीख ३ जुलै २०२२ आहे.

या स्पर्धेतील विजेत्यांना मायभूमीच्या जुलै महिन्यात होणाऱ्या व्याख्यानमाला कार्यक्रमात LIVE PERFORM करण्याची संधी मिळेल. राष्ट्रीय कीर्तनकार चारुदत्त आफळे त्या कार्यक्रमाचे अध्यक्ष असणार आहेत.

होल्डिंग हॅन्ड्स
बहुउद्देशिय संस्था, औरंगाबाद
समाजाच्या हितासाठी एकमेकांचा हात धरून मानवी साखळी बनवूया.
संस्थेचे उद्देश
माणसे जोडणे | आरोग्य | शिक्षण | पर्यावरण | सांस्कृतिक
महिला लघु उद्योग आणि रोजगार | सामाजिक बांधिलकी असलेले सर्व उपक्रम

सुरेश सिरसीकर
संस्थापक/अध्यक्ष

रविंद्र बनकर
उपाध्यक्ष

अपर्णा मेहता
सचिव
अधिक माहितीसाठी : 7020577693 | holdinghands092@gmail.com

# राज्य कर निरीक्षक पदनिहाय पेपरची तयारी

आधुनिक केसरी

**दुय्यम सेवा परीक्षेच्या पदनिहाय पेपरमधील सामायिक अभ्यासक्रमाच्या तयारीबाबत मागील काही लेखांमध्ये चर्चा करण्यात आली. या लेखामध्ये राज्य कर निरीक्षक पदाच्या पदनिहाय अभ्यासक्रमाच्या तयारीबाबत चर्चा करू. नियोजन प्रक्रिया, प्रकार, भारताच्या पहिल्या ते दहाव्या पंचवार्षिक योजनेचा अभ्यास करताना योजनांची उद्दिष्टे, ध्येयवाक्ये, प्रतिमाने, सुरू झालेल्या विकास व कल्याणकारी योजना, राजकीय आयाम, कालावधी, ठळक निर्णय, मूल्यांकन यांचा आढावा घ्यायला हवा. निती आयोगाची रचना, कार्ये, प्रस्तावित योजना / उद्दिष्टे यांचा आढावा घ्यायला हवा.**




सामाजिक व आर्थिक विकासाचे निर्देशांक म्हणजेच रोजगार, दारिद्र्य, भूक, मानवी विकास, व्यवसाय सुलभता याबाबत आंतराष्ट्रीय स्तरावरील भारताचे स्थान व राष्ट्रीय स्तरावरील महाराष्ट्राचे स्थान माहीत करून घ्यावे. राज्य आणि स्थानिक पातळीवरील नियोजन, विकेंद्रीकरण यांचा अभ्यास करताना ७३वी व ७४वी घटनादुरूस्तीने स्थानिक स्वराज्य संस्थांना सोपविलेले अधिकार माहीत करून घ्यावेत.

भारतीय अर्थव्यवस्था, क्षेत्रीय विकासाचा कल व सेवाक्षेत्राची रूपरेखा यांचा अभ्यास करताना अर्थव्यवस्था विषयाच्या मूलभूत संकल्पना समजून घेणे आवश्यक आहे. त्या आधारे या उपघटकाची तयारी करता येईल. भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील आव्हाने, गरिबी, बेरोजगारी आणि प्रादेशिक असमतोल यांचा अभ्यास करताना आर्थिक व राजकीय अशा दोन्ही आयामांचा विचार करायला हवा. म्हणजेच याबाबतची आर्थिक पार्श्वभूमी आणि याबाबतचे शासकीय पातळीवरील प्रयत्न यांचा अभ्यास करायला हवा.

ऊर्जा, पाणीपुरवठा, मलनिःसारण, गृह, परिवहन (रस्ते, बंदर इत्यादी), दळणवळण (पोस्ट, तार व दूरसंचार), रेडिओ, टीव्ही, इंटरनेट या पायाभूत सुविधांचे आर्थिक विकास आणि सामाजिक अभिसरण यातील योगदान आणि भारतातील त्यांच्या विकास व विस्ताराचे टप्पे व त्यासाठीचे प्रयत्न यांचा आढावा घेणे आवश्यक आहे. याबाबत ग्रामीण व शहरी भागातील परिवहन व गृह या विषयीचे प्रश्न व त्यावरील केंद्र व राज्य सरकारचे कार्यक्रम व उपक्रमशीलता यांवर विशेष भर द्यायला हवा.

तसेच भारतातील इन्फ्रास्ट्रक्चर सुविधांमधील प्रादेशिक असमतोल, गुंतवणूक, दर्जा व इतर समस्यांचा बारकाईने अभ्यास करावा. इन्फ्रास्ट्रक्चर विकासाचे पर्याय म्हणून खासगी व सार्वजनिक क्षेत्रातील भागीदारी, एफ डी आय., खासगीकरण या धोरणांमागची भूमिका व त्यातील तरतूदी समजून घ्याव्यात. राज्य व केंद्र सरकारची वेगवेगळया पायाभूत सुविधांच्या विकासासाठीची धोरणे समजून घ्यावीत तसेच याबाबत चालू घडामोडी माहीत असायला हव्यात.

पार्श्वभूमी, उदारीकरण, खासगीकरण, जागतिकीकरण संकल्पना व त्याचा अर्थ आणि व्याप्ती, मर्यादा यांचा संकल्पनात्मक आणि विश्लेषणात्मक अभ्यास आवश्यक आहे. केंद्र व राज्य स्तरावरील आर्थिक सुधारणांचे टप्पे व त्यांचे परिणाम यांचा आढावा घ्यायला हवा. WTO तरतूदी आणि सुधारणा आणि त्याचे भारतीय अर्थव्यवस्थेवरील अपेक्षित परिणाम, प्रश्न व समस्या, आणि त्याबाबतच्या चालू घडामोडी समजून घेणे आवश्यक आहे. GST विक्री कर, VAT, WTO इत्यादीशी संबंधित कायदे व नियम मुळातून वाचणे जास्त व्यवहार्य आहे. यातील ठळक तरतुदी माहीत असायलाच हव्यात.

जागतिकीकरणाच्या युगातील सूत्र व काल, वाढ, रचना या संकल्पना व्यवस्थित समजून घ्याव्यात. भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराची दिशा, निर्यातीतील वाढ या बाबींची आकडेवारी आर्थिक पाहणी अहवालातून अद्ययावत करून घ्यावी. भारतीय आंतरराष्ट्रीय व्यापाराचे धोरण, WTO आणि आंतरराष्ट्रीय व्यापार विदेशी भांडवलाचा अंतःप्रवाह, रचना व वाढ यातील महत्त्वाचे टप्पे समजून घ्यावेत. तसेच चालू घडामोडी माहीत करून घ्याव्यात. प्रत्यक्ष परकीय गुंतवणूक (FDI) व्यापार त्याबाबतचे शासकीय धोरण समजून घ्यावे. बहुराष्ट्रीय भांडवल पुरविणाऱ्या संस्था, IMF जागतिक बँक, IDA इंटरनॅशनल क्रेडिट रेटिंग या संस्थांचे कार्य, महत्त्वाचे नियम / ठराव, सदस्य, यातील भारताची भूमिका / योगदान समजून घ्यावे.

कर आणि करेतर महसुलाचे स्रोत, केंद्र व राज्य सार्वजनिक खर्च या संकल्पना समजणे आवश्यक आहे. केंद्र व राज्यातील सार्वजनिक ऋण, सार्वजनिक खर्च वाढ यांची कारणे समजून घ्यावीत. सार्वजनिक खर्च सुधारणा कामावर आधारित अर्थसंकल्प, शून्याधारित अर्थसंकल्प, वित्तीय उत्तरदायित्व आणि अर्थसंकल्प व्यवस्थापन कायद्यातील तरतूदी माहीत असायला हव्यात. भारतातील केंद्र व राज्य पातळीवरील कर सुधारणांचा आढावा महत्त्वाचे टप्पे, त्यांची पार्श्वभूमी, कारणे, स्वरूप, परिणाम, यशापयश या मुद्द्यांच्या आधारे घ्यावा. सार्वजनिक ऋणवाढ, रचना आणि भार, राज्याच्या कर्जबाजारीपणाची केंद्राला समस्या या बाबी विश्लेषणात्मक प्रश्नांसाठी तयार कराव्या. त्यासाठी संकल्पना समजून घेणे आवश्यक आहे. राजकोषीय तूट, संकल्पना, तूटीचे नियंत्रण या संकल्पना समजून घ्याव्यात. तूट नियंत्रणासाठीचे केंद्र, राज्य व रिझर्व्ह बँकेचे उपक्रम, केंद्र आणि राज्यस्तरावरील राजकोषीय सुधारणा यांचा आढावा घ्यायला हवा.



# एसबीआय बँकेत बंपर भरती, थेट मुलाखतीच्या माध्यमातून होणार निवड

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये स्पेशलिस्ट कॅडर ऑफिसर पदांसाठी अर्ज मागवले आहेत. यासाठी अधिकृत वेबसाइटवर नोटिफिकेशन प्रसिद्ध करण्यात आले असून पदासाठी लागणारी शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा, अनुभव, अर्जाची शेवटची तारीख यांचा सविस्तर तपशील देण्यात आला आहे. ही भरती कंत्राटी पद्धतीने केली जाणार आहे. एसबीआय स्पेशल कॅडर भरती अंतर्गत एकूण ११ पदांची भरती करण्यात येणार आहे. ज्यामध्ये डिफेन्स बँकींग ॲडवायझर नेव्हीचे १, सल्लागार सीआरपीएफचे १, सीआरपीएफ सर्कल सल्लागाराचे १, सर्कल डिफेन्स बँकिंग सल्लागाराचे ३, संशोधन विश्लेषक २, रिसर्च ॲनालिस्ट इक्विटीचे १, संशोधन विश्लेषक प्रायव्हेट इक्विटीचे १ आणि इतर १ पद भरले जाणार आहे. वेगवेगळ्या पदांसाठी वेगवेगळी वयोमर्यादा असेल. ज्यामध्ये एकूण किमान वयोमर्यादा २४ वर्षे आणि कमाल ६२ वर्षे आहे. या पदांसाठी उमेदवारांची निवड शॉर्टलिस्टिंग आणि मुलाखतीच्या माध्यमातून केली जाणार आहे. मुलाखतीचे कॉल उमेदवारांना लेटर ईमेलवर पाठवले जाणार आहे.

पदभरतीसाठी अर्ज करताना उमेदवारांनी रेझ्युमे, दहावी, बारावी आणि शैक्षणिक प्रमाणपत्रं, शाळा सोडल्याचा दाखला, जातीचा दाखला (मागासवर्गीय उमेदवारांसाठी), ओळखपत्र (आधारकार्ड, लायसन्स) आणि पासपोर्ट साईझ फोटो हे दस्तावेज सोबत जोडणे आवश्यक आहे. या पदासाठी आरक्षित वर्गातील उमेदवारांना पदभरती आणि वयोमर्यादेमध्ये सरकारी नियमानुसार सवलत देण्यात येणार आहे. याचा सविस्तर तपशील नोटिफिकेशनमध्ये देण्यात आला आहे.

या पदांसाठी ७५० अर्ज शुल्क आकारण्यात आहे. एससी, एसटी आणि दिव्यांग उमेदवारांना यातून सवलत देण्यात आली आहे. उमेदवारांना अधिकृत वेबसाइट SBI.CO.IN वर जाऊन ऑनलाइन अर्ज करता येणार आहे. यासाठी अर्ज प्रक्रिया २३ जूनपासून सुरु झाली आहे. १३ जुलै ही अर्ज करण्याची शेवटची तारीख आहे. अर्ज करण्यापुर्वी उमेदवारांनी नोटिफिकेशन काळजीपूर्वक वाचावे. अर्जामध्ये काही त्रुटी असल्यास किंवा दिलेल्या मुदतीनंतर आल्यास अर्ज बाद करण्यात येईल याची उमेदवारांनी नोंद घ्या.

# सीबीएसई ९ वी आणि ११ वीच्या नोंदणी प्रक्रियेत चुकीच्या माहितीसाठी शाळा प्रशासन जबाबदार

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने इयत्ता नववी आणि अकरावीच्या नोंदणी संदर्भात महत्वाची अपडेट देण्यात आली आहे. तसेच सीबीएसई बोर्डाकडून शाळांना निर्देश देण्यात आले आहेत. यानुसार नववी आणि अकरावी ऑनलाइन नोंदणी प्रक्रिया १ जुलैपासून सुरू होत आहे. यावेळी शाळांनी विद्यार्थ्यांचा तपशील अचूक भरणे गरजेचे आहे. चुकीची माहिती भरल्यास शाळा प्रशासन जबाबदार असेल असे सीबीएसई बोर्डाने म्हटले आहे. विद्यार्थ्यांची माहितीचा तपशील एकदा पोर्टलवर सबमिट केल्यानंतर ते दुरुस्त करता येत नाही. त्यामुळे शाळांनी नोंदणीत चुका करू नयेत, अशा सूचना मंडळाने दिल्या आहेत.

सीबीएसईने नववी आणि अकरावीच्या विद्यार्थ्यांच्या नोंदणीसाठी मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केली आहेत. या अंतर्गत, एकदा विद्यार्थ्यांचे तपशील शाळेने ऑनलाइन सबमिट केले की, ते बदलता येणार नाही. शाळेने विद्यार्थ्यांचे आणि पालकांचे संपूर्ण नाव लिहावे, संक्षिप्त नावामुळे विद्यार्थ्याला भविष्यात अडचणी येऊ शकतात असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

नववी आणि अकरावीच्या दहावी आणि बारावी बोर्डाच्या परीक्षांसाठी बोर्ड ऑनलाइन नोंदणी करते. या प्रक्रियेअंतर्गत मुलांचे नाव, पालक, कोर्स कॉम्बिनेशन, जन्मतारीख आणि इतर महत्त्वाची माहिती भरली जाते.

**नोंदणीची अंतिम तारीख ३० सप्टेंबर**

१ जुलैपासून सुरू होणारी नोंदणी प्रक्रिया ३० सप्टेंबरपर्यंत चालणार आहे. यासाठी ३०० रुपये इतका शुल्क भरावा लागेल. त्यानंतर १ ते १५ ऑक्टोबर या कालावधीत अतिरिक्त दोन हजार रुपये विलंब शुल्कासह नोंदणी करता येईल. अशाप्रकारे, विद्यार्थ्यांना विलंब शुल्क म्हणून २,३०० रुपये भरावे लागतील. परदेशातील सीबीएसई शाळांमधील नववीच्या विद्यार्थ्यांना ५०० रुपये आणि अकरावीच्या विद्यार्थ्यांना ६०० रुपये द्यावे लागतील.





# नीट परीक्षा होणार नाही स्थगित

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** राष्ट्रीय पात्रता सह प्रवेश परीक्षा २०२२ प्रवेशपत्र आता लवकरच प्रसिद्ध होण्याची अपेक्षा आहे. पदवीधर वैद्यकीय आणि दंतचिकित्सक अभ्यासक्रमांसाठी परीक्षा १७ जुलै २०२२ रोजी होणार आहे. नॅशनल टेस्टिंग एजन्सी, एनटीए, NEET.NTA.NIC.IN या अधिकृत वेबसाइटवर प्रवेशपत्र जारी करू शकतात. शिवाय, नीट २०२२ परीक्षा सिटी इंटिमेशन स्लिप या आठवड्यात प्रसिद्ध होण्याची अपेक्षा आहे.

दरम्यान, नीट २०२२ परीक्षा पुढे ढकलण्याच्या वाढत्या मागणीच्या पार्श्वभूमीवर शिक्षणमंत्र्यांनी परीक्षा पुढे ढकलण्यात येणार नसल्याचे सांगितले आहे. नियोजित वेळापत्रकानुसार १७ जुलै २०२२ रोजी परीक्षा घेतली जाईल. एनटीएला तेच शैक्षणिक कॅलेंडर पुनर्संचयित करायचे आहे जे कोरोना महामारीमुळे विस्कळीत झाले होते. गेल्या दोन वर्षांत, लॉकडाऊन आणि शाळा बंद झाल्यामुळे शैक्षणिक कॅलेंडरला फटका बसला आहे. प्रवेश परीक्षांना आणखी विलंब झाल्यास शैक्षणिक वर्ष आणखी लांबेल, ज्यामुळे अभ्यासावर परिणाम होऊ शकतो.

नीट २०२२ च्या वेळापत्रकानुसार, आता या आठवड्यात परीक्षेची शहर सूचना स्लिप जाहीर होईल अशी अपेक्षा आहे. मात्र, प्रवेशपत्राच्या तारखेबाबत अद्याप कोणतीही घोषणा करण्यात आलेली नाही. १० जुलैपर्यंत प्रवेशपत्र जारी केले जाण्याची शक्यता आहे. ज्या उमेदवारांनी परीक्षेला बसण्यासाठी अर्ज केला आहे ते त्यांच्या नोंदणी क्रमांकाच्या मदतीने त्यांचे प्रवेशपत्र डाउनलोड करू शकतील.



# सत्तेचा खेळ थांबवा अन्यथा पँथर सेना रस्त्यावर उतरेल : दीपक केदार

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** इडीच्या खांद्यावर बंदूक ठेवून हिंदुत्वाचा अजेंडा राबविला जात आहे. एकनाथ शिंदेंचे बंड हे इडीला घाबरुन आहे. हिंदुत्व हे केवळ राजकीय सत्तेसाठीचा खूळखुळा झाला आहे. या बंडामुळे अग्निपथ योजना, नुपूर शर्मा या मुद्यांना बगल दिली जात आहे. महाराष्ट्र सध्या उद्ध्वस्त अवस्थेत आहे. शेतकरी, मजुर, दलित उद्योजक हा सर्व समुह सत्तेच्या खेळात वेठीस धरला गेला आहे म्हणून तात्काळ सत्तेचा हा खेळ थांबवा अन्यथा ऑल इंडिया पँथर सेना रस्त्यावर उतरेल, असा इशारा पँथर सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष दिपक केदार यांनी दिला आहे.

साक्रीरोडवरील धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघात घेतलेल्या पत्रकार परिषदेत केदार बोलत होते. ते म्हणाले की, लोकशाहीच्या माध्यामातून उभी राहत असलेली हिंदुत्ववादी सत्ता ही लोकशाही आणि संविधानाला आव्हान देणारी आहे. त्यामुळे आंबेडकरी कार्यकर्त्यांनी निळे रुमाल गळ्यात घालुन शिंदे गटाचे रक्षण करायला सिक्युरीटीच्या भुमिकेत येवू नये. भाजपने आमचा वापर थांबवावा शिंदे गट हा कर्मठ, जातीयवादी आहे. वेळ आल्यास ते मनसेत विलिन होतील पण रिपाई, आठवले गटात विलीन होणार नाही. पंतप्रधान मोदी हे जर्मनीत जावून लोकशाहीच्या गप्पा मारतात. भारतात मात्र हुकूमशाहीच्या बळावर सत्ता चालवत आहेत. शासकीय नोकऱ्यांमध्ये कंत्राटपध्दतीतून हिंदुत्ववादी धार्मिकीकरण करण्याचा डाव आहे.

राज्यात सुध्दा जि.प. शाळेत कंत्राटी शिक्षक भरती होणार आहे. एसटी महामंडळात प्रशिक्षण पूर्ण झालेले आहे. ही पध्दत कामगार हक्कांना, कामगारांना गुलाम करणारी आहे. जवळपास ५ हजार तरुण असताना नव्याने कंत्राटी भरती काढली भिमा कोरेगाव दंगलीतील ३५ हजार भिमसैनिकांवर खोटे गुन्हे दाखल केले गेले आहेत. ते मागे घ्यावेत, रमाई घरकुलला १० लाख रुपये घ अशी योजना आणावी, बुध्द लेण्यांवरील अतिक्रमण रोखले जावे. या मागण्यांसाठी पँथर सेना राज्यव्यापी मोर्चा काढणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

यापत्रकार परिषदेला पँथर सेनेचे जिल्हाध्यक्ष सागर मोहिते, अशोक पाटील, आनंद अमृतसागर, भाऊसाहेब बैसाणे, राकेश महाले, समाधान मंगळे, सुशिल रामराजे, आकाश बैसाणे, आकाश घोडे, गोरख अहिरे, बुध्दभूषण सरदार, गोपाल शिरसाठ, सलमान खान, दिनेश गरुड उपिस्थत होते.

# "तिमिर" नावाचा एक दीर्घांक सुदर्शन रंगमंच येथे सादर

आधुनिक केसरी

पुण्यात नाटय कलाकार आणि रसिक प्रेक्षक यांची आवडती ठिकाणे म्हणजे बालगंधर्व आणि सुदर्शन रंगमंच. नाटय प्रेमी आवर्जून वेळ काढून नाटक पाहण्यासाठी येथे येतातच. नुकताच "तिमिर" नावाचा एक दीर्घांक सुदर्शन रंगमंच येथे सादर झाला. माझ्या आवडत्या कलाकार आरती गुप्ते यांनी प्रमुख भूमिका आणि दिग्दर्शन केलेले असल्यामुळे एक चांगला प्रयोग पहायला मिळणार ही खात्री होती आणि ती पूर्ण झाली.

राजश्री आपटे यांनी "तिमिर" हा दीर्घांक लिहिला आहे. यांनी आधी नेमप्लेट, त्या रात्री, प्रेमालाप या एकांकिका सादर केल्या आहेत. या दीर्घांकात यांनी आपल्या मुलामुलींचे वय कितीही झाले तरी आई नेहमीच त्यांच्यामागे खंबीरपणे उभी राहते, असते या विषयी मांडणी केली आहे. आरती गुप्ते यांनी आईची भूमिका अप्रतिम केली आहे. मंगेश दळवी यांनी मुलाच्या भूमिकेत खूप सुंदर अभिनय केला आहे. एकुलता एक मुलगा, सेटल झालेला आणि अचानक एका घटनेने कोलमडून जाणारा... मस्तच तिमिर मनातला दूर होत नाही तोपर्यंत काही खरे नाही! बाहेर कितीही दिव्यांचा झगमगाट असून, आशाचे किरण मनातून प्रकट होत नाही तो पर्यंत सारे जीवन अंधकारमय आहे. अशा अनेक प्रतिक्रिया प्रेक्षकांच्या आहेत. सर्व काही संपलं असे वाटत असताना, कोणत्याही वयात, मागे वळून पाहताना मात्र फक्त आईच पाठीमागे उभी असते. राजश्री आपटे, आरती गुप्ते, मंगेश दळवी आणि सर्व टीमचे मनःपूर्वक अभिनंदन आणि शुभेच्छा.



# स्वाभिमानीचे प्रशांत डिक्कर यांच्यासह २५ आंदोलकांना जामीन मंजूर




आधुनिक केसरी न्यूज

जळगाव जा : शेतकऱ्यांच्या हक्काचे ६४ कोटी पिक विमा रक्कम शेतकऱ्यांना मिळेपर्यंत रिलायन्स कंपनीच्या विरोधात वेळोवेळी केलेल्या आंदोलनातुन दाखल झालेल्या गुन्ह्यातील प्रशांत डिक्कर यांच्यासह २५ आंदोलकांची न्यायालयाने जामिनावर सुटका केली आहे. मागिलवर्षी पिक विमा प्रश्नावर आंदोलनाची धार कायम ठेवत स्वाभिमानीने सतत संघर्ष चालुच ठेवला आणि तालुक्याच्या तहसील कार्यालयापासून ते मुंबई मंत्रालयापर्यंत आणि शेवट कृषी आयुक्त पुणे कार्यालयासह ठिकाणी वेळोवेळी आंदोलने करुन विमा कंपनीला ६४ कोटी विमा रक्कम शेतकऱ्यांना देण्यास भाग पाडले हि वस्तुस्थिती आहे. जळगाव मतदार संघातील ५५ हजार दोनशे शेतकऱ्यांना सोयाबीनचा पिक विमा मिळवुन देण्यासाठी आंदोलनांच्या माध्यमातून कंपनी व प्रशासनाच्या विरोधात उपोषण, मोर्चे, मेळावे, आंदोलने केल्याने शेकडो आंदोलकांवर विविध कलमान्वये गुन्हे दाखल करण्यात आले होते. यातील एका मेळाव्यामध्ये पोलिसांनी २९ आंदोलकांवर गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल केले होते. त्यामुळे १५ जुन रोजी २९ आंदोलकांना न्यायालयाने समन्स बजावुन २७ जुन रोजी जळगाव न्यायालयात हजर राहण्याचे आदेश दिले. जळगाव न्यायालयाचे न्यायदंडाधिकारी एस.एच. बेलेकर यांनी हजर झालेल्या आंदोलकांना प्रत्येकी १५ हजाराच्या जात मुचलक्यावर २६ आंदोलकांची सुटका केली असून यावेळी ॲड. रुपेश विश्वकर यांनी पक्षकारांच्या वतीने काम पाहिले. यामधे स्वाभिमानीचे प्रशांत डिक्कर, रोशन देशमुख, सुपेश वाघ, मोहन गांवडे, नानाराव वाघ, महादेव वाघ, विनोद करांगळे, विजय वाघ, नरेंद्र वाघ, प्रमोद करांगळे, दिनेश वाघ, प्रकाश वाघ, भिमराव तिजारे, राजेंद्र वाघ, शुभम वाघ, सागर वाघ, मंगेश वाघ, विनोद पान्हेरकर, सहदेव सातव, सचिन वाघ, मयुर गायकी, देविदास पान्हेरकर, अंनता पान्हेरकर, अक्षय वाघ, सुनिल वानखडे, अंनता गायकी उपस्थित होते.

# तुमचं राजकारण अन् आमचं मरण !

## महाराष्ट्राला वाली कोण ? पावसाबरोबर कृषीमंत्री गायब..!



शांताराम मगर
संपर्क क्र. 9421417540

आधुनिक केसरी

**महाराष्ट्र उन्हाने करपलेला आहे. मृग नक्षत्र संपले. पुढच्या दोन्ही नक्षत्रांनी धोका दिला. इकडे महाराष्ट्रात कडक उन्हात शेती करपून निघाली. केलेल्या पेरण्या फुकट जाण्याच्या मार्गावर असून पुन्हा दुबार पेरणीचे संकट घोंगावत आहे. एकरी दोन हजार रुपयांचा खर्च... वरती मजूरी, एवढे करून पाऊस येईल की, नाही याची खात्री नाही.... सामान्यपणे खरीप हंगाम जवळ आला की, राज्याचा कृषीमंत्री विभागवार दौरे करून बी-बियाणे वाटपांची व्यवस्था कशी आहे. पुरवठा करणाऱ्यांकडे पुरेसे खते बियाणे पोहोचले की नाही, अशा अनेक व्यवस्था विभागवार बैठका घेवून कराव्या लागतात... सध्या महाराष्ट्राचा कृषीमंत्री कोण? ते कोणालाही माहिती नाही.. जे दादा भुसे नावाचे कृषीमंत्री आहेत, ते आसाममध्ये जावून चेरापुंजीचा पाऊस बघत बसलेले आहेत.**

जगाचा पोशिंदा म्हणून ओळख असणारा शेतकरी राजा स्वतःच एकवेळच्या जेवणासाठी आज मोहताज झालाय. त्याच स्वैरसुतक गोरगरिबांचे कैवारी, बुलंद आवाज म्हणवून घेणाऱ्या राजकीय नेते मंडळींना नाही. सत्तेच्या सारिपाटावर खुर्ची की मिरची म्हणत एकमेकांच्या जिरवा-जिर्वीचा डाव मांडून खेळण्यात ते दंग आहेत. ईतके दिवस उलटत आले तरी शासनाच्या लालफितीच्या कारभारात बळीराजा मात्र आभाळाकडे डोळे लावून बसला आहे.

महाराष्ट्रातील अनेक शेतकऱ्यांनी शेती क्षेत्रात क्रांती केली काळ्या आईच्या कुशीत हिरव्यागार शेतीच सपान फुलवल! कापुस, कांदा, टमाटे शेतीत सतत नाविन्यपूर्ण क्रांती करून सुमधुर व डाळींबाची अवीट गोडी सातासमुद्रापार पोहोचवली. कधी आवकाळी पाऊस तर कधी दुष्काळ व पाण्याचा वाणवा याचा कलंक कपाळी घेऊन जन्मलेल्या या मराठवाड्याची ओळख पांढऱ्या सोन्याची पंढरी म्हणून करून दिली.

अपार कष्ट करण्याची जिद्द, दुःख सोसण्याची अफाट सहनशक्ती याच्या जोरावर त्याची शेतीत घोडदौड सुरूच राहिली. कधी अस्मानी तर कधी सुलतानी संकटाने मात्र त्याची पाठ सोडलीच नाही. कधी अत्यल्प पाऊस तर कधी पाऊस व पाण्याची कमतरता, कधी स्थानिक दलाल व परप्रांतीय व्यापारी यांच्या सनगनमताने दर पाडणे तर कधी व्यापाऱ्यांकडून गंडा, कधी खराब हवामान तर कधी अवकाळी गारपीट अशा नानाविध संकटांनी त्याच्या घामाने पिकवलेली शेती मातीत मिसळली गेली. कर्जाच्या बोझ्यात साहजिकच वाढ होत गेली. एकेकाळी सधन समृद्ध महाराष्ट्र म्हणून ओळख बनलेल्या या राज्याची ओळख दिवसेंदिवस 'दुष्काळी' म्हणून गणली असताना आपली राजकीय पोळी भाजून घेण्यासाठी मतांचा जोगवा मागून या आगोदर मोर्चे, आंदोलन करून महाराष्ट्रातील नेतेमंडळी मात्र वातानुकूलित गाडीत बसून फिरून लालबुंद झाली. मात्र राज्यातील जनता शेतीच्या विविध समस्येत पुरती काळवंडून गेली. कर्जबाजारी होत गेली.



लाथ मारीन तिथं पाणी काढणारा जिगरबाज शेतकरी न थकला न थांबला. गडी ऊन पावसाची वाऱ्या-वादळाची पर्वा न करता पक्षाप्रमाणे उंच उंच गगनभरारी घेतच राहिला. रणरणत्या उन्हात पोटच्या लेकरापेक्षांही जीवापाड जपलेल्या डाळींब मोसंबी जगवण्यासाठी टँकरचा आधार घेऊन बागा जगवल्या. डोक्यावर कर्जाच्या बोझ्याचा डोंगर घेऊन अविरत धडपड करत राहिला. 'दिस जातील दिस येतील, भोग सरल सुख येईल..! या उक्तीप्रमाणे आशावादी राहून अपार कष्ट करत राहिला. पण यंदाच्या मृग नकक्षेत्राच्या पावसाने दांडी मारल्याने शेतकरीवर्ग हवालदिल झाला. अच्छे दिनाचे त्याचे स्वप्न समाजकारणाच्या नावावर राजकारण करणाऱ्या नेतेमंडळी प्रमाणे पावसाने दडी मारल्याने स्वप्न भंगले आसुन लाखो हेकटर क्षेत्र उध्वस्त होण्याच्या मार्गावर आहेत.

तरी मायबाप सरकार म्हणून ज्यांच्याकडे याचना करायची तीच मंडळी सत्ता-सुंदरीच्या नादात एकमेकांना वाकुल्या दाखवू लागली आहे. हीच मंडळी राजकीय डावपेच आखण्यात व्यस्त असल्याने सरकारच्या ठिसाळ नियोजनाचा फटका शेतकऱ्यांना बसत आहे. ऐकीकडे खतांचा तुटवडा भरमसाठ वाढलेल्या किमती यामुळेच शेतकरीवर्ग नैराश्यग्रस्त असून या कृषी प्रधान देशात शेतकऱ्यांवर आत्महत्येची वेळ यासारखी दुर्दैवी गोष्ट कोणती आहे.

सरकार आमदारांचे पगार वाढवत आहे मात्र शेतकऱ्यांच्या समस्येकडे कानाडोळा करत आहे. ही अत्यंत निंदणीय गोष्ट आहे. असा संतप्त सवाल राज्यातील तमाम जनतेचा आहे. त्यांच्या तोंडातून एकच संतापजनक प्रतिक्रिया आहे. तुमचं होतंय राजकारण मात्र आमचं चाललंय मरण...

# ग्रामीण भागातली लालपरी हरवली... आत्ता बाबा मी कसं जाऊ शाळेला...

## गेल्या अडीच वर्षापासून बससेवा विस्कळीत लाखो रूपयांचे परिवहन महामंडळाचे नुकसान

आधुनिक केसरी न्यूज

**आप्पासाहेब भावले**

**आडूळ :** कोरोनाच्या काळापासून महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसेस ग्रामीण भागात चालू नसल्यामुळे नागरीकांची गैरसोय होत आहे. गेल्या ५० वर्षापासून एसटी बस सेवा सुरू असलेली पैठण ते दरेगाव एसटी बस पैठण आगार स्थानकावरून करोनाच्या काळापासून बंद झाली आहे. शाळा सुरू होऊन चौदा दिवस उलटून गेली आहे परंतु अद्याप एसटी बस सेवा शाळकरी मुलांना एसटी बस नसल्यामुळे पुढील शिक्षणासाठी काहीच पर्याय देखील उरला नाही.

दरेगाव ते पैठण ३५ किलो मिटर अंतर आहे विद्यार्थीयांना सरस्वती भुवन प्रशाला बालानगर येथे इयत्ता १० वी प्रर्यत शिक्षण घेण्यासाठी पायी जावे लागते. मुलींना घरापासून शाळा सहा किलोमीटर अंतरावर आहे. आत्ता कसे होणार शिक्षण मुलींचे असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.




**मुलगी शिकली प्रगती झाली शासनाचे ध्येय धोरण कागदावरच**

कोरोनाच्या काळात आनलाईन शिक्षणामुळे शाळकरी मुला मुलींचे मोठे शैक्षणिक नुकसान झाले मुलींना मोबाईल टॅब मिळालाच नाही. ग्रामीण भागात जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत इयत्ता आठवीपर्यंतच शाळा आहे. मुलींना पुढील शिक्षणापासून वंचित राहावे लागत आहे.

**आमच्या गावात आठवीपर्यंत शाळा आहे. काही मुले सोईनुसार नातेवाईकांकडे शिक्षण घेण्यासाठी गेले आहे. मुलींच्या टिसी शाळेतून काढून घरात पडल्या आहेत. येण्या जाण्याची गैरसोय आहे. एसटी बस सेवा चालू करावी.**

**शिवकन्या मैंद / मयूरी नलावडे**
**शालेय विद्यार्थी**

**आम्ही विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ देणार नाही. विद्यार्थीच्या पासेस पाहिजे. डिझेलचे खूप भाव वाढले. पहिले ३५ रूपये डिझेल होते. आता १०० रूपये झाले आहे. आम्हाला बस सोडण्यासाठी परवडत नाही.**

**सुहास तरवडे**
**एसटी बस आगार प्रमुख पैठण**

# तरुण शेतकऱ्याची गळफास घेऊन आत्महत्या

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** बाजारसावंगी येथे तरुण शेतकऱ्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना दि.28 रोजी सकाळी



10:30 वाजेच्या दरम्यान घडली. बाजार सावंगी येथील शेतकरी योगेश तेजराव काटकर वय (36) याने शेखपुर शिवारातील गट न.36 मधील आंब्याच्या झाडाला दोरीच्या सहाय्याने गळफास घेऊन आपली जीवनयात्रा संपवली.

नेहमी प्रमाणे योगेश काटकर सकाळी आपल्या शेतात गेला होता. त्यानंतर थोड्यावेळाने त्याची पत्नी सविता व मुलगी वैष्णवी हे शेतात आले असता योगेशने गळफास घेतल्याचे दिसले. त्यांनी लगेच आपल्या घरी कळवले. त्यानंतर योगेशचा लहान भाऊ श्रीराम काटकर तेथे आला व पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी घटनस्थळी येऊन स्थानिकांच्या मदतीने मृतदेह खाली उतरविला व पंचनामा केला. त्यानंतर बाजारसावंगी येथील प्राथमिक आरोग्य केंद्र येथे वैद्यकीय अधिकारी अंजुम निलोफर यांनी शवविच्छेदन केले. त्यानंतर येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. आत्महत्येचे कारण समजू शकले नाही. अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास जमादार नवनाथ कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रकाश ठोकळ, संतोष पुंड हे करत आहेत.

# कुख्यात गुंडाविरुद्ध लावला मोक्का

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** नांदेड येथील पोलीस अधिकारी व अंमलदार असे नांदेड पोलीस स्टेशनमध्ये आरोपी नामे नवप्रीतसिंग तारेसमिसिंग उर्फ तारेशसिंग जाट (सिन्हा) उर्फ मनदीपसिंग सुरदीपसिंग जाट, रा. अंबेपुरा पो.जस्तरवाल ता. अजनाला जि. अमृतसर (पंजाब) व मोहित उर्फ मनी विजय शर्मा, रा.ग.नं.३, बटालारोड, अमृतसर (पंजाब) यांना अटक करणेकरिता सुरत येथुन नांदेड येथे शासकीय वाहनाने घेवून जात असताना रात्री ८.३० वाजेचे सुमारास धुळे जिल्ह्यातील कुसुंबा गावाचे पुढे नमुद आरोपींनी पोलीसांच्या रखवालीतून पळून जाण्यासाठी नांदेड पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे प्रखर हल्ला करुन हातकडीसह पळून गेले होते म्हणुन धुळे तालुका पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता. दि.२८/१२/२०२१ रोजी सोनगीर पोलीसांना लामकाणी येथे सदरील फरार आरोपी मिळुन आल्यानंतर त्यांना अटक करण्यात आली.

नमुद आरोपींनी मागील १० वर्षाचे कालावधीत संघटीत गुन्हेगारी करून ३ वर्षापेक्षा जास्त शिक्षेस पात्र असलेले एकूण ०८ गुन्हे (त्यात जबरी चोरी, दरोडा, चोरी, शासकीय कर्मचाऱ्यांवर हल्ला करून जबर दुखापती करून कायदेशीर रखवालीतून पलायन करणे) केलेले असून त्यापैकी ४ गुन्ह्यांची न्यायालयाने दखल घेतलेली आहे. प्रचलीत कायद्यानुसार प्रतिबंधित केलेले बेकायदेशीर कृत्य आरोपींचे टोळीने स्वतःचे व टोळी सदस्याचे आर्थिक फायद्यासाठी दखलपात्र व गंभीर स्वरुपाचे गुन्हे केलेले आहेत. पोलीस निरीक्षक, धुळे तालुका पोलीस स्टेशन यांनी नमुद आरोपीविरुध्द मोक्का कायद्यान्वये कारवाई करण्यासाठी पोलीस अधीक्षक धुळे यांचे मार्फत विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र, नाशिक यांची पूर्व परवानगी घेण्यासाठी प्रस्ताव सादर केला. त्यानुसार नमुद गुन्हयास मोक्का कायद्यान्वयेचे वाढीव कलम लावण्याची परवानगी प्राप्त होवुन उपविभागीय पोलीस अधिकारी, धुळे ग्रामीण उपविभाग, साक्री यांनी गुन्हयाचा तपास करुन गुन्हयातील दोन्हीही आरोपीविरुध्द विशेष न्यायालय तथा अति सत्र न्यायालय, धुळे यांचे न्यायालयात मोक्का कायद्यान्वये दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक प्रविणकुमार पाटील, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत बच्छाव यांचे मार्गदर्शनात उपविभागीय पोलीस अधिकारी, धुळे ग्रामीण उपविभाग साक्री प्रदिप मैराळे, पोलीस निरीक्षक हेमंत प्र. पाटील, पोना.संतोष हिरे यांनी केली आहे.



# आमदार संजय शिरसाट यांच्या समर्थनात औरंगाबादेत दुग्धाभिषेक, बॅनरबाजी

आधुनिक केसरी न्यूज

**सागर प्रधान**

**औरंगाबाद :** राज्यात मागील काही दिवसापासून राजकीय खळबळ माजली आहे. एकनाथ शिंदे यांनी काही आमदारांसह शिवसेनेसोबत बंड केल्यानंतर महाराष्ट्रात शिवसेना विरुद्ध शिंदे असे युद्ध पाहायला मिळत आहे. अशातच राज्यात अनेक ठिकाणी शिवसेनेने बंडखोर आमदारांचे कार्यालय आणि बॅनर फाडलेल्या घटनासमोर आल्या. त्यानंतर बंडखोर आमदारांचे समर्थक सुद्धा आक्रमक झाले आहे. आज औरंगाबादेत आमदार संजय शिरसाट यांच्या समर्थनात समर्थकांकडून जोरदार शक्तिप्रदर्शन करण्यात आला. यावेळी अनेक समर्थक उपस्थित होते. समर्थकांकडून संजय शिरसाट आणि एकनाथ शिंदे यांचे ठिकठिकाणी समर्थनात बॅनरबाजी करून फोटोला दुग्धाभिषेक करण्यात आला. समर्थकांचा घोषणेने संपूर्ण परिसर दणाणून उठला होता. यावेळी बाळासाहेब ठाकरे, आनंद दिघे यांच्या घोषणा देण्यात आल्या. एकनाथ शिंदे, संजय शिरसाट तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है अश्या जोरदार घोषणा कार्यकर्त्यांकडून यावेळी देण्यात आल्या. बॅनरवर 'हाच माझा विठ्ठल' असा मजकूर सुद्धा लिहण्यात आला होता. विजय चाबुकस्वार यांच्या नेतृत्वाखाली हे समर्थन पार पडले. सुनील माटे, वैभव वडगावकर, शुभम अंगुरे, उमेश बनकर, अजय ढोकळे, आकाश गायकवाड, आकाश मुख्यदल, रोहन पाखरे इ. कार्यकर्ते उपस्थित होते.



# विद्यार्थ्यांनो काळानुरूप करिअर क्षेत्र निवडा : प्रा. संतोष कार्ले

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** दि.27 जुन रोजी सहकार महर्षी बाळासाहेब पवार सार्वजनिक वाचनालय, कन्नड आयोजित "करियर मार्गदर्शन आणि रोजगाराच्या संधी" या विषयावर बोलताना प्रमुख वक्ते, महाराष्ट्रातील तज्ञ करिअर मार्गदर्शक प्रा.संतोष कार्ले म्हणाले की, उद्योग, व्यवसाय, तंत्रज्ञान आणि शिक्षण आदी सर्वच क्षेत्रांमध्ये आज करियर आणि रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होत आहेत, त्या संधीचा फायदा ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी घेतला पाहिजे, तरच येणाऱ्या काळासोबत आपले जगणे सुखर होईल. तेव्हा कौशल्य अवगत करत गुणात्मक शिक्षण घेतले पाहिजे. तसेच 10 वी व 12 वी नंतरच्या करिअर संदर्भातील हजारो संधी त्यांनी सांगितल्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी महाविद्यालय, कन्नडचे प्राचार्य डॉ. विजय एन. भोसले हे होते. ते म्हटले की, महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व धार्मिक क्षेत्रांमध्ये लोकनेते, सहकार महर्षी बाळासाहेब पवार यांचे कार्य-कर्तुत्व आणि योगदान अमूल्य आहे. त्यांच्या विचारांचे उचित वैचारिक स्मारक व्हावे, त्यातून समाज उद्धार झाला पाहिजे, हा विचार मनात घेऊन महाराष्ट्रातील ज्येष्ठ उद्योजक, या वाचनालयाचे अध्यक्ष तथा श्री. छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मानसिंह पवार यांनी पुढाकार घेत त्यांनी आपल्या कल्पनेतून कन्नड शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी सर्व आधुनिक सुविधानियुक्त, सुसज्ज सहकार महर्षी बाळासाहेब पवार सार्वजनिक वाचनालयाची ही भव्य इमारत उभारली आहे. हे वाचनालय संस्कार आणि नॉलेज सेंटर झाले पाहिजे, असा त्यांचा मानस आहे. तेव्हा तालुक्यातील विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि नागरिकांनी सर्व सुविधांचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले. तसेच ग्रामीण विद्यार्थ्यांनी आपल्या मनातील न्यूनगंड काढून टाकत, ज्ञानकेंद्री बनले पाहिजे, झाले तर त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण होईल, असे प्रतिपादन केले.

या कार्यक्रमास सहकार महर्षी बाळासाहेब पवार सार्वजनिक वाचनालयाचे सचिव रामकृष्ण पवार, कालिदास उपासनी, वाचनालयाचे व्यवस्थापक वैभव घुले, ग्रंथपाल वेदांत भोसले हे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वैभव घुले, सूत्रसंचालन डॉ. प्रकाश खेत्री आभार प्रा.एच.जी. पवार यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा.आर.टी. नागे, ग्रंथपाल प्रा.संतोष देशमुख, संजय जाधव, प्रशांत शिंदे, रविंद्र भागवत यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास विद्यार्थ्यांसह मुख्याध्यापक रामेश्वर राठोड, प्रा. मोबीन पटेल, छाया सोनवणे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

# वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदोन्नती करण्याची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** आरोग्यसेवा हि अत्यावश्यक सेवा म्हणून ओळखली जाते याच विभागातील वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदोन्नती मागील २३ वर्षांपासून रखडली आहे. शासनाने यांचा गांभीर्याने विचार करून त्वरीत निर्णय घेवून दिलासा द्यावा अन्यथा संघटनेच्या वतीने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. जनतेचे आरोग्य अबाधित ठेवण्यासाठी आरोग्य विभाग सदैव तत्पर असते. विशेषता परिचारिका ते वैद्यकीय अधिकारी यांनी स्वताला झोकून दिल्याने महामारी आटोक्यात आली आहे. देशभरात मागील दोन वर्षांपूर्वी करोनाने अक्षरशा थैमान घातले होते. अशा कठिण प्रसंगी जिवाची पर्वा न करता आरोग्य विभागाने उत्कृष्ट सेवा बजावली आहे. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी जीव धोक्यात घालून कोव्हीड पॅनडेमिक कालावधीत भारतिला टॉप ५ मध्ये आणण्याचे काम केले आहे. अशा क्षेत्रातील वैद्यकीय अधिकाऱ्यांची गट ब(एमबीबीएस) यांना गट अ मध्ये पदोन्नती हवी आहे. शासनाकडे अनेक वर्षांपासून मागणीचा तगादा लावला आहे पण यावर काहि तोडगा निघला नाही. प्रलंबीत असलेली मागणी मान्य करून दिलासा द्यावा अन्यथा संघटनेच्या वतीने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा महाराष्ट्र राज्य राजपत्रित वैद्यकीय अधिकारी महासंघ नांदेडचे अध्यक्ष डॉ. अरूण कोळी यांनी एका निवेदनाद्वारे केली आहे.

# सावळदबारा ग्रामीण भागात चाखली जातेय लोणच्याची चव

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात आधुनिक जमान्यात विविध लोणचे तयार करण्याच्या अनेक ब्रँडेड कंपन्या आल्या असल्या तरी ग्रामीण भागात पूर्वापार चालत आलेली आणि पावसाळ्यापूर्वी लोणचे घालण्याची पद्धत अजूनही टिकून असून आहाराची गोडी वाढवणारी लोणची घालतांना ग्रामीण भागात अजूनही पाहायला मिळत आहे.

पारंपारिक आणि पूर्वजांपासून सावळदबारा ग्रामीण भागात लोणची तयार करण्याची परंपरा अजूनही ग्रामीण भागातील लोकांनी जपली आहे. मुर्गाचा पहिला पाऊस सुरू झाला की लोणच्यास लायक असलेले आंबे घरी आणून त्यापासून लोणचे बनवले जाते.ते तयार करण्यासाठी बरीच दक्षताही घेतली जाते. तयार होणारे लोणचे आहाराची रुची वाढवते अगदी लहाणापासून वयोवृद्धांपर्यंत आवडीने खाल्ले जाते. आधुनिक जमान्यात लोणचे तयार करण्याच्या वेगवेगळ्या कंपन्या आल्या असल्या तरी घरच्या लोणच्याची चव मात्र वेगळीच असते. तयार केलेले लोणच्याची साठवण करून अनेक महिने त्याची रुची चाखली जाते. भात रोप लागणीच्या काळात ही लोणची दुपारच्या आहारात सर्रास ग्रामीण भागात पहायला मिळतात. घरोघरी तयार होणारी लोणची यासाठी वयोवृद्धांची मार्गदर्शन घेतले जाते ते मार्गदर्शन मात्र वेगळेच असते आणि त्यांच्या अनुभवातून हे लोणचे बनवले जाते व टिकवले जाते.



# संतप्त महिला व पुरुषांचा धुळे महापालिकेवर हंडा मोर्चा

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** उन्हाच्या झळा सहन करत असताना नागरिकांना आता पाणीटंचाईला देखील सामोरे जावे लागत आहे. दहा ते पंधरा दिवस उलटूनही धुळे शहरातील प्रभाग क्रमांक 12 मध्ये पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होत नसल्यामुळे संतप्त महिला, पुरुषांनी थेट महापालिकेवर हंडा मोर्चा काढला. तसेच आयुक्तांच्या कार्यालयाबाहेर ठिय्या आंदोलन करून मनपा प्रशासनाचा निषेधही यावेळी व्यक्त केला आहे. यावेळी घोषणाबाजी करत प्रभाग क्रमांक 12 मधील नागरिकांनी परिसर दणाणून सोडला होता.

एक दिवस आड किंवा पाच दिवसाआड पाणी देण्याचे आश्वासन पालिका प्रशासनातर्फे नागरिकांना वेळोवेळी देण्यात आले आहे. परंतु जवळपास दहा ते पंधरा दिवस उलटून देखील पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होत नसल्यामुळे संतप्त नागरिकांना हंडाभर पाण्यासाठी वणवण भटकंती करावी लागत आहे. मनपा प्रशासनातील आयुक्त व इतर अधिकाऱ्यांनी पाण्याचे योग्य नियोजन करून पाणीपुरवठा सुरळीत करण्याचे आश्वासन देऊनही पूर्तता न केल्याने आज प्रभाग क्रमांक 12 मधील महिला व पुरुषांनी एकत्रित येत थेट पाहण्यासाठी हंडा मोर्चा धुळे महापालिकेवर काढला आहे.

तसेच यावेळी आयुक्तांच्या दालना बाहेर ठिय्या आंदोलन करत धुळे महापालिका प्रशासनाच्या विरोधात घोषणाबाजी करीत तीव्र संताप व्यक्त केला आहे. तसेच जोपर्यंत समस्या सुटत नाही तो पर्यंत या जागेवरुन उठणार नसल्याचा पवित्रा नागरिकांनी घेतला आहे.

# नांदेड विभागातील रेल्वेच्या दोन फेऱ्या रद्द

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागातून धावणाऱ्या डेम्यू रेल्वेच्या दोन फेऱ्या रद्द करण्यात आल्या आहेत. मनमाड-अंकाईदरम्यान दुहेरीकरणाच्या कामाला गती देण्यात आली आहे. सदर कामामुळे घेण्यात आलेल्या मेगा ब्लॉकचा फटका नांदेड विभागातून धावणाऱ्या अनेक गाड्यांना बसत आहे.

यापूर्वी नांदेड विभागातून धावणाऱ्या अनेक एक्स्प्रेस रद्द करण्यात आल्या आहेत.

त्यातच आता जालना येथून सुटणारी गाडी संख्या ०७४९१ जालना-श्रीसाईनगर शिर्डी -जालना दरम्यान धावणाऱ्या विशेष डेम्यू एक्सप्रेस दि. ३० जून रोजी रद्द करण्यात आली आहे. श्रीसाईनगर शिर्डी येथून सुटणारी गाडी संख्या 07492 श्री साईनगर शिर्डी जालना विशेष डेम्यू एक्सप्रेस दि.30 रोजी रद्द करण्यात आली आहे. जालना येथून सुटणारी गाडी संख्या ०७४९३ जालना नगर सोल विशेष डेम्यू एक्सप्रेस दि.१ जुलै रोजी रद्द करण्यात आली आहे. नगरसोल येथून सुटणारी गाडी (०७४९४) नगरसोल - जालना विशेष डेमू एक्स्प्रेस २९ जून आणि १ जुलै रोजी रद्द करण्यात आली आहे. प्रवाशांना होणाऱ्या तांत्रीक अडचणीच्या असुविधेबदल रेल्वे प्रशासन माहिती देऊन दिलगिरी व्यक्त केली आहे.



# धमाल विनोदी एकपात्री कार्यक्रमाचे सादरीकरण

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** सुप्रसिध्द कवी व लेखक अय्युब पठाण लोहगांवकर यांनी जायकवाडी (उत्तर) ता. पैठण येथील शाहू विद्यालयात "मुले रंगली काव्यात" हा धमाल विनोदी एकपात्री सांस्कृतीक कार्यक्रमाचे प्रभावीपणे सादरीकरण केले. यामध्ये, भक्तीगीत, पोवाडे, भारूडे, हुंडाबळी, साक्षरता गीते, विनोदी नकला व काव्यवाचन सादर करून धमाल विनोदी एकपात्री सांस्कृतीक कार्यक्रमातून विद्यार्थ्यांचे मनोरंजनातून प्रबोधन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक शंकरराव वाघमोडे होते, तर प्रमुख पाहूणे म्हणून गोरक्षनाथ वांढेकर होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार प्रदर्शन शिक्षक हरिश्चंद्र धांडे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक- वसंतराव काळे, भुषण ठाकुर, संजय माळी, शिवाजी नजन, प्रदीप थोरात, काकासाहेब खैरे, अशोक दिलवाले, सचिन वाघमोडे, तर शिक्षिका- श्रीमती संगीता शिंदे, श्रीमती यशोदा मुकाडे, आणि शिक्षकेत्तर कर्मचारी- शिवाजी किर्जत, ग्रंथपाल बारीकराव ढोले, सुधीर नलावडे, विकास शेजूळ यांनी परिश्रम घेतले. याप्रसंगी विद्यालयातील सर्व विद्यार्थी -विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अमरनाथ यात्रेसाठी नांदेडमधून १०५ भाविक उद्या होणार रवाना

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** अत्यंत कठीण समजली जाणारी व प्रत्येक हिंदु मनाला भावणारी अमरनाथ यात्रेला सतत एकोणिसाव्या वर्षी धर्मभूषण ॲड. दिलीप ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली 105 यात्रेकरूंचा पहिला जथ्था शुक्रवार दि.1 जुलै रोजी सकाळी नऊ वाजता सचखंड एक्सप्रेसने रवाना होणार आहे. तेरा दिवस चालणाऱ्या यात्रेत दिल्ली, अमरनाथ, सोनमर्ग, गुलमर्ग, श्रीनगर, खिर भवानी माता, वैष्णोदेवी, जम्मू, अमृतसर, अटारी बॉर्डर या धार्मिक व प्रेक्षणीय स्थळांची पाहणी करण्यात येणार आहे. अवघड यात्रा सुरळीत पार पडावी यासाठी चार महिण्यापासून यात्रेकरुंनी दररोज सहा कि.मी. चालण्याचा व प्राणायाम करण्याचा सराव केला आहे. पहिल्या जत्थ्यात ५७ पुरूष, ४८ महिलांचा समावेश आहे. नांदेड व्यक्तिरिक्त गोवा, हैदराबाद, पुणे, ठाणे, अमरावती, नासिक, औरंगाबाद, परभणी, लातूर, हिंगोली, जालना, आदिलाबाद, करिमनगर येथील यात्रेकरू सहभागी झाले आहेत. यात्रेकरूंना प्रत्येकी एक वेळेसचे भोजन खा. प्रतापराव पाटील चिखलीकर, दीपकसिंह गौर औरंगाबाद, नवनाथ सोनवणे उदगीर, चंद्रकांत गंजेवार, नागेश शेट्टी,



हृदयनाथ सोनवणे, मनोज शर्मा नागपुर, प्रदीप शुक्ला भोपाळ, बापू कदम भुसावळ, कवि प्रताप फौजदार दिल्ली, सरदार सुदीपसिंघ अमृतसर, सुभाष बंग, ज्ञानोबा जोगदंड जम्मू यांच्या तर्फे देण्यात येणार आहे. जगन्नाथ सोनवणे, कदम परिवार, डॉ. अजयसिंग ठाकूर पूर्णा, स्नेहलता जैस्वाल हैदराबाद, स्वाती कुलकर्णी, राजेश डुलगच औरंगाबाद हे अल्पोहार देणार आहेत.

यात्रेकरूंसाठी डॉ. सुदर्शन, डॉ. संतोष मालपाणी, नांदेड जिल्हा केमिस्ट व ड्रगिस्ट संघटना, अमरनाथ यात्री संघ मुखेड यांनी मोफत औषधी दिल्या आहेत. यात्रेकरूंना शुभेच्छा देण्यासाठी भाजप-सेना, काँग्रेस, राष्ट्रवादी, आरएसएस, विश्व हिंदू परिषद, बजरंग दल, एजांय स्विमींग ग्रुप, विसावा ग्रुप, नानक साई फाउंडेशन व इतर संघटनेचे पदाधिकारी येणार आहेत. नांदेडकरांनी सकाळी नऊ वाजता रेल्वे स्थानकावर यावे असे आवाहन अमरनाथ यात्री संघातर्फे करण्यात आले आहे.



# पिंपळगाव काळे सरपंच, उपसरपंच यांचा पदग्रहण सोहळा

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा :** 27 जून रोजी तालुक्यातील सर्वात मोठी असलेल्या पिंपळगाव काळे येथील सरपंच प्रितीताई गोपाल तायडे व उपसरपंच भारतीताई महेन्द बांगर यांचा पदग्रहण सोहळा संपन झाला. 17 सदस्य संख्या असलेल्या तालुक्यातील सर्वात मोठ्या पिंपळगाव काळे ग्रामपंचायत पदी दोनही महिला असून विकासाच्या दृष्टीने नागरिकांना मुलभूत सुविधा देण्यावर भर दिला जाईल असा विश्वास सरपंच व उपसरपंच यांनी यावेळी व्यक्त केला.

सोहळ्याला मा.जि.प. अध्यक्ष प्रकाश पाटील, मा. जि.प. सदस्या ज्योतीताई ढोकणे, विजय पोहनकार राज्य प्रवक्ते बारा बलुतेदार संघटना, काँग्रेस तालुका अध्यक्ष अविनाश उमरकर, वंचित आघाडिचे तालुका अध्यक्ष संतोष गवई, उपाध्यक्ष श्रीकृष्ण गवई यांनी या कार्यक्रमाला मार्गदर्शन केले व नवनिर्वाचित सरपंच उपसरपंच यांना भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाला तालुका अध्यक्ष कुंभार समाज संघटना डिंगाबर हिवरकर, आनंदराव काळे, मा.जि.प. सदस्या पुजाताई पाटील, महीला तालुकाध्यक्ष राधाताई खापट, महादेव घुटे, कदिर मौलाना, सुधाकर घटे, हरिभाऊ वाघमारे, ग्रामपंचायत सदस्य नवलसिंग मावळे, सचिन जाधव, अशोक ढोले, शे.हारुन, नवल गोतरकर, आशाताई कळस्कार, यशोदाताई घटे, वंदनाताई निकम, दुर्गाताई मांडोकार, उषा चोखंडे, सुशिलाबाई भोपळे, विनायक पाटील, शालीकराम भोपळे, ईनुस अतार, गजानन तायडे, बाबुसिंग जाधव, विनोद गवई, सोसायटी अध्यक्ष विजय बहादरे, श्रीकृष्ण वानखडे, सुनिल काकडे, मयुर राऊत, रफिक मन्यार, मोहन भोपळे, प्रतापसिंग जाधव, सुपडा पाटील, सागर जंवजाळ, ओंकार तायडे, किशोर घटे, बंटी कळसकार, महिंद्रा बांगर, उमेश मांडोकार, बालु निकम, महादेव तायडे, आरीफभाई, किशोर वाकोडे, रामभाऊ कळसकार, मनु पाटील, त्रंबक मुडोकार, ओंकार मुडोंकार, मनोहर मांडोकार, अमित जाधव आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन अतुल उमाळे यांनी केले तसेच पदग्रसण सोहळ्यास मोठ्या प्रमाणात भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व वंचित बहुजन आघाडी कार्यकर्ते उपस्थित होते.

